दैनिक
# ग्लोबल भारत
वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं
dailyglobalbharat@gmail.com
संपादक – शरद खेमचंद अडागळे
www.globalbharatlive.com
❑ औरंगाबाद ❑ वर्ष ४ थे ❑ अंक ३३७ वा ❑ गुरूवार दि.१२ सप्टेंबर २०२४ ❑ पाने ८ ❑ मुल्य ५ रू

## ७० वर्षांवरील सर्वांना आयुष्मान भारत विमा कवच मिळणार


नवी दिल्ली दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज (११ सप्टेंबर) झालेल्या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीतील सर्वात मोठा निर्णय म्हणजे, ७० वर्षांवरील वृद्धांचा आयुष्मान योजनेत समावेश करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव याबाबत माहिती देताना म्हणाले, या निर्णयाचा देशातील ४.५ कोटी कुटुंबांमधील ६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना फायदा होणार आहे. या सर्व वृद्धांना पाच लाख रुपयांच्या मोफत आरोग्य विमा कवच योजनेचा लाभ देण्याचं सरकारचं उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना नवीन व स्वतंत्र आयुष्मान कार्ड दिलं जाणार आहे.

अश्विनी वैष्णव म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आजच्या बैठकीत स्पष्ट केलं की ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेंतर्गत संरक्षण द्यायला आपण वचनबद्ध आहोत. आयुष्मान भारत योजनेत आधीच समाविष्ट केलेल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांचाही आता समावेश केला जाणार आहे. या ज्येष्ठांना दर वर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे अतिरिक्त टॉप-अप कव्हर मिळेल. जे ज्येष्ठ नागरिक सध्या केंद्र सरकारच्या कोणत्याही दुसऱ्या आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट असतील तर त्यांना आयुष्मान भारत योजनेत स्विच करण्यचा पर्याय असेल.

७० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती विचारात न घेता सरसकट सर्वांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. देशातील सर्व ज्येष्ठ नागरिक या आयुष्मान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. या पात्र नागरिकांना नवीन व स्वतंत्र आयुष्मान कार्ड दिलं जाणार असल्याचं वैष्णव यांनी यावेळी स्पष्ट केलं.

आजच्या कॅबिनेट बैठकीत इतरही अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ई-बस पेमेंट सुरक्षा यंत्रणेची घोषणा केली. याअंतर्गत देशातील १६९ शहरांमध्ये ३८,००० इलेक्ट्रिक बसेस चालवल्या जाणार आहेत. यामुळे प्रदूषण कमी करण्यास मदत मिळेल, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. देशातील दुर्गम भागांमधील गावांना जोडण्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत ६२,५०० किलोमीटरचे नवीन रस्ते बांधण्याच्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी ७०,१२५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच २०० कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेलं 'मिशन मौसम' आता सुरू केलं जाणार आहे. यामुळे हवामानाची अचूक माहिती मिळेल. प्रामुख्याने शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होईल.

## देशाचे तुकडे करणाऱ्या शक्तींसोबत उभे राहणे ही राहुल गांधी अन् काँग्रेसची सवय; अमित शाह यांचा पलटवार



नवी दिल्ली दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सध्या देशभरात आरक्षणाचा मुद्दा गाजत आहे. महाराष्ट्रातही मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा गेल्या वर्षभरापासून ऐरणीवर आला आहे. याचदरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी थेट अमेरिकेवरुन आरक्षणावर आपली भूमिका मांडली. योग्य वेळ आल्यावर काँग्रेस आरक्षण संपवण्याबद्दल विचार करेन. जेव्हा देशात सर्वांना समान संधी मिळू लागतील, असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधींच्या या विधानावरुन देशभरात पडसाद उमटले आहेत.

केंद्रीय मंत्री अमित शाह यांनीही राहुल गांधींवर निशाणा साधला आहे. देशाविरोधात बोलणे आणि देशाचे तुकडे करणाऱ्या शक्तींसोबत उभे राहणे ही राहुल गांधी आणि काँग्रेसची सवय झाली आहे. मग ते जम्मू काश्मीरमध्ये जेएनकेसीच्या देशविरोधी आणि आरक्षण विरोधी अजेंड्याचे समर्थन करणे असो, वा परदेशातील व्यासपीठांवर भारताविरोधात बोलणे. राहुल गांधींनी नेहमी भारताच्या सुरक्षेला आणि भावनांना ठेच पोहोचवली आहे, अशी टीका अमित शाह यांनी केली आहे.

भाषा-भाषांमध्ये, प्रांता-प्रांतामध्ये आणि धर्मा-धर्मात भेदभाव निर्माण करण्याबद्दल बोलणे, यातून राहुल गांधी यांचे फूट पाडण्याचेच विचार दिसतात.राहुल गांधींनी देशातून आरक्षण संपवण्याची भाषा करून काँग्रेसचा आरक्षणविरोधी चेहरा पुन्हा एकदा देशासमोर आणण्याचे काम केले आहे. मनातील गोष्टी आणि विचार कोणत्या ना कोणत्या माध्यमातून बाहेर येतच असतात, असं अमित शाह यांनी सांगितले. तसेच मी राहुल गांधींना सांगू इच्छितो की जोपर्यंत भाजप आहे, आरक्षणाला कुणीही धक्का लावू शकत नाही आणि देशाच्या एकतेसोबत छेडछाड करु शकत नाही, असं मत अमित शाह यांनी व्यक्त केलं आहे.

## इलेक्ट्रॉनिक्स उद्योगासाठी ५०० अब्ज डॉलरच्या टप्प्याचे लक्ष्य; पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून २०३० पर्यंतचे उद्दिष्ट

नवी दिल्ली दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- देशातील इलेक्ट्रॉनिक्स उद्योगासाठी २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलरच्या उलाढालीचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी निर्धारित केले. इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाची उलाढाल गेल्या दशकभरात वेगाने वाढत असून, सध्या ती १५० अब्ज डॉलर आहे.

'सेमिकॉन इंडिया' परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान मोदी बोलत होते. ही परिषद तीन दिवस चालणार असून, त्यात देशाची सेमीकंडक्टर व्यूहनीती आणि भारत हा सेमीकंडक्टरचे जागतिक केंद्र बनविण्यासाठीचे धोरण यावर भर देण्यात आला आहे. मोदी म्हणाले की, सध्या भारताचा इलेक्ट्रॉनिक्स उद्योग १५० अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. आता आपण आणखी मोठे लक्ष्य ठेवायला हवे. या दशकाच्या अखेरीस इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राला आपल्याला ५०० अब्ज डॉलरवर न्यावयाचे आहे. त्यातून देशातील तरुणांसाठी ६० लाख रोजगार निर्माण होतील. शंभर टक्के इलेक्ट्रॉनिक्स निर्मिती भारतात व्हावी, हे आमचे उद्दिष्ट आहे. भारत हा सेमीकंडक्टर चिप बनवेल आणि त्याचे अंतिम उत्पादनही बनवेल.

उद्योग हे गुंतवणूक करून मूल्य निर्मिती करीत असताना सरकार स्थिर धोरणे आणि व्यवसायपूरक वातावरण निर्माण करीत आहे. जागतिक डिझाईनिंग क्षेत्रात भारताचे योगदान २० टक्के असून, ते सातत्याने वाढत आहे. भारत हा (पान ४ वर)

## भारताविरोधी भूमिका मांडणाऱ्या इल्हान ओमरची राहुल गांधींनी घेतली भेट, भाजपा आक्रमक!

नवी दिल्ली दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारताविरोधी भूमिका मांडणाऱ्या इल्हान ओमर यांची लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज भेट घेतली. या भेटीवरून भाजपाने राहुल गांधी यांना लक्ष्य केलं आहे. राहुल गांधी यांचा अमेरिकन दौरा आधीपासूनच वादग्रस्त ठरला आहे. त्यातच, या भेटीची भर झाल्याने भारतात परतल्यावर त्यांना मोठ्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे.



इल्हान ओमर या कायम भारताविरोधीत भूमिका मांडतात. राहुल गांधी यांच्या तीन दिवसीय अमेरिका दौऱ्यात मंगळवारी अमेरिकेतली अनेक खासदारांची भेट घेतली. यावेळी त्यांनी इल्हान ओमर यांचीही भेट घेतली.

या बैठकीवर भारतातील भाजपा नेत्यांकडून टीकेची झोड उठली. बुधवारी पत्रकार परिषदेला संबोधित करताना राज्यसभेचे खासदार आणि भाजपाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी म्हणाले, "राहुल गांधी हे भारतविरोधी विष पसरवण्यासाठी ओळखले जातात, (पान ४ वर)

## आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधींचा खरा चेहरा पुढे आला-देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- काँग्रेसचे नेते राहुल गांधीं यांनी आरक्षणावरुन केलेल्या विधानाची सध्या देशभर चर्चा सुरु आहे. जेव्हा योग्य वेळ येईल, त्यावेळी काँग्रेस आरक्षण संपविण्याचा विचार करेल. पण सध्या ती योग्य वेळ नाही, असं राहुल गांधी काल एका कार्यक्रमात म्हणाले. राहुल गांधींच्या या विधानावरुन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीकास्त्र सोडलं आहे.

राहुल गांधी यांचा आणि काँग्रेसचा खरा चेहरा या निमित्याने परत एकदा समोर आला आहे. राहुल गांधी आरक्षण संपवण्यासंदर्भात त्यांनी विदेशात एक वक्तव्य केले आहे. एक बाजूला निवडणुकीत खोटं नरेटिव पसरवायचे आणि दुसऱ्या बाजूला परदेशात जाऊन आरक्षण संपवण्याची भाषा करायची, हे दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा काँग्रेसने कधीच सन्मान केला नाही.

बाबासाहेबांना कधी लोकसभेत निवडून जाऊ दिलं नाही. दोन वेळेला षडयंत्र करून बाबासाहेबांचा पराभव करणारा हाच काँग्रेस पक्ष आहे. मतांसाठी ते खोटे नरेटिव तयार करतात, हे राहुल गांधी यांच्या वक्तव्याने स्पष्ट झाले आहे. किंबहुना भाजपची भूमिका स्पष्ट आहे. भाजप आरक्षणाचे बाजूने असून भाजप कधीही आरक्षण संपू देणार नाही. असे मत व्यक्त करत देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांचा आणि काँग्रेसवर टीका केली आहे.

## शिंदेंच्या आमदाराच्या सुरक्षा रक्षकाची एकाला रॉडने बेदम मारहाण, ठाकरे गटाकडून व्हिडीओ व्हायरल



मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- एकनाथ शिंदे यांच्या शिवेसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या सुरक्षा रक्षकांने एका व्यक्तीला रॉडने मारहाण केल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आलाय. या घटनेचा व्हिडीओ ठाकरेंच्या शिवेसेनेने ट्वीटरवर पोस्ट केलाय. त्यामुळे शिंदे गटाच्या कार्यकर्त्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. महेंद्र थोरवे आमदार आहेत, त्यांच्या बॉडीगार्डने ही मारहाण केल्याचा आरोप केला जातोय. भर रस्त्यामध्ये हा धक्कादायक प्रकार घडलाय.

नेरळमधील हा व्हिडीओ असल्याचे सांगितले जात आहे. "मिंधे राजवट फक्त गुंडांसाठीच!", असा आशय लिहित ठाकरे गटाने सोशल मीडियावर हा व्हिडीओ पोस्ट केला आहे. एका कारमध्ये एक व्यक्ती बसलाय. त्याच्यासोबत बाचाबाची झाल्यानंतर ही मारहाण झाल्याचे सांगण्यात येत आहे. हातात दंडुका घेऊन त्या व्यक्तीला मारहाण केली जात आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ठाकरे गटाकडून उपस्थित केला जातोय. शिवा असं महेंद्र थोरवेंच्या बॉडीगार्डचं नाव आहे, त्याच्याकडून ही मारहाण केली जात असल्याचे ठाकरे गटाकडून सांगण्यात आले आहे.

हे कार्यकर्त्यांमध्ये (पान ४ वर)

## सेबी अध्यक्षांवर नव्याने आरोप; प्रतिसादशून्य मौनावरही 'हिंडेनबर्ग'कडून प्रश्न

नवी दिल्ली दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भांडवली बाजार नियामक 'सेबी'च्या अध्यक्ष माधबी पुरी बुच यांनी त्यांच्याद्वारे नियमन केल्या गेलेल्या कंपन्यांना सेवा पुरवणाऱ्या सल्लागार कंपनीत ९९ टक्के मालकी हिस्सा राखल्याचा आणि त्यायोगे कोट्यवधींचे उत्पन्न मिळविल्याच्या आरोपाचा बुधवारी हिंडेनबर्ग रिसर्चने पुनरुच्चार केला. या आरोपांबद्दल सेबीप्रमुखांच्या सोयीस्कर मौनाबद्दल तिने प्रश्न उपस्थित केला आहे.

'एक्स' या समाजमाध्यमांवरील टिप्पणीत, हिंडेनबर्ग रिसर्चने सेबीप्रमुखांवर काँग्रेस पक्षाकडून सुरू असलेल्या 'हितसंबंधांच्या संघर्षा'च्या आरोपांचा पुनरुच्चार केला. ॲगोरा ॲडव्हायजरी ही सल्लागार कंपनी माधबी बुच यांच्या मालकीची आहे. या कंपनीने महिंद्र ॲण्ड महिंद्र, आयसीआयसीआय बँक, डॉ. रेड्डीज आणि पिडिलाइट यांसह सूचिबद्ध संस्थांना सेवा प्रदान केली असून, त्यासमयी बुच या 'सेबी'च्या पूर्णवेळ सदस्य म्हणून कार्यरत होत्या, असे हिंडेनबर्गचे ताज्या टिप्पणीतील आरोप आहेत. याच प्रकारचे आरोप काँग्रेसने मंगळवारी (१० सप्टेंबर) पत्रकार परिषदेत केले होते.

(पान ४ वर)

## हिंदुत्व शिकवणाऱ्यांना गोमांस कसे चालते?, संजय राऊत यांचा गंभीर आरोप



मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नागपूरमध्ये जो अपघात झाला त्यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत गाडी चालवत होता. अपघातानंतर दुसऱ्या व्यक्तीला चालक म्हणून दाखवण्यात आले आणि संकेतला वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, संबंधित गाडीत लोकांना महागड्या मद्याच्या बाटल्या आणि एका पंचतारांकित हॉटेलचे चार जणांचे मांसाहारी जेवणाचे बिल आढळून आले आहे. त्यामध्ये 'बीफ कटलेट'चे देखील बिल समाविष्ट असल्याचा दावा त्यांनी केला आहे. एकीकडे बीफवरून लोकांना मारहाण करायची आणि दुसरीकडे बीफ खाऊन लोकांना चिरडायचे, असे म्हणत संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधला आहे.

संजय राऊत म्हणाले की, एकीकडे आम्हाला हिंदुत्वाच्या गोष्टी सांगायच्या, श्रावण आहे, गणपती आहे, असे सांगायचे. तर दुसरीकडे गोमांस खाऊन रस्त्यावर सर्वसामान्यांचे जीव घ्यायचे, हे राज्यात चाललंय तरी काय? देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र तुम्हाला माफ करणार नाही. महाराष्ट्राच्या कायद्यासव्यवस्थेच्या बाबतीत सध्या धिंडवडे काढले जात आहे. काळ्याकुट्ट अक्षरात ही घटना लिहिली जाईल. अशा प्रकारचा घटिया गृहमंत्री या राज्याला कधीही लाभला नाही, असे म्हणत (पान ४ वर)

## नागपूर हिट अँन्ड रन: काँग्रेस आमदार विकास ठाकरे सुषमा अंधारे यांच्यात जुंपली

नागपूर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे पुत्र संकेतच्या ऑडी कारने दोन चारचाकी आणि एका दुचाकीला धडक दिली. या घटनेनंतर विरोधी पक्षाच्या निशान्यावर भाजप आणि गृहमंत्री आहे.

शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी गुरुवारी थेट नागपूर गाठले आणि सीताबर्डी पोलिसांकडून या प्रकरणाची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी भाजप, गृहमंत्रालयावर अनेक प्रश्न उपस्थित केले. ऑडीमध्ये बसलेल्या संकेत बावनकुळे यांचे एफआयआरमध्ये नाव नसल्याबद्दल त्यांनी ठाणेदाराला थेट प्रश्न विचारला. हे प्रकरण हाताळण्यात पोलीस असक्षम ठरले की बावनकुळे भारी पडले ?, असेही ठाणेदाराला विचारणा केली. त्यावर ठाणेदार यांनी काहीही ठोस उत्तर दिले नाही. संकेत बावनकुळे यांचे रक्ताचे नुमने घेण्यात का आले नाही. नागपुरातील लोहारी बारमधून ऑडीने संकेत आणि त्याचे मित्र निघाले होते. वाटेत त्यांनी सर्वप्रथम रामदास पेठेत दोन चारचाकींना धडक दिली. लोकांनी संकेत आणि त्यांच्या मित्रांना चोप दिला. तेथून पळून जात असताना मानकापूर भागात पुन्हा एका दुचाकीला धडक दिली. तसेच त्यांनी बारमध्ये गायीचे मांसाचे (पान ४ वर)

## मनोज जरांगेंकडे पाडापाडीशिवाय दुसरे काहीच नाही-लक्ष्मण हाके

मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मनोज जरांगे यांना पाडापाडीशिवाय दुसरे काहीच येत नाही. त्यांचा आरक्षणावर कोणताही अभ्यास नाही. त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत केवळ ५ उमेदवार उभे करावेत आणि त्यांनी निवडून आणावेत. त्यांचे आंदोलन जेथून चालते, त्या आंतरवाली सराटीतही त्यांनी आपला उमेदवार द्यावा, असे आव्हान ओबीसी आरक्षणासाठी लढा देणाऱ्या लक्ष्मण हाके यांनी जरांगेंना दिले आहे. यावेळी त्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांनी जरांगेंच्या घेतलेल्या भेटीवरही निशाणा साधला.

लक्ष्मण हाके बुधवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, मनोज जरांगे यांची सध्या नौटंकी सुरू आहे. त्यांच्याकडे पाडापाडीशिवाय दुसरे काहीच नाही. त्यांचा ओबीसी आरक्षणावर कोणताही अभ्यास नाही. ते उठसूट उपोणाला बसतात. त्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षा ठेवणेही चुकीचे ठरते. आमचा लढा ओबीसींच्या न्यायासाठी आहे. अशा प्रकरणांत चर्चा महत्त्वाची असते. पण ते चर्चेला बोलावले तर स्वतःही येत नाहीत आणि दुसऱ्यांनाही पाठवत नाहीत.

मनोज जरांगे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत केवळ ५ ठिकाणी उमेदवार उभे करून दाखवावेत. एवढेच नाही तर त्यांनी त्यांच्या आंदोलनाचे केंद्र असणाऱ्या आंतरवाली सराटीतही उमेदवार देऊन दाखवावा. त्यांनी ओबीसी उमेदवारांना पाडण्याचा निर्धार केला आहे. ही लढाई ओळखण्याची गरज असून, आमचा हा लढा सुरूच राहणार आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

लक्ष्मण हाके यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी मध्यरात्रीनंतर घेतलेल्या मनोज जरांगे यांच्या भेटीवरही निशाणा साधला. ते म्हणाले, मनोज जरांगे यांना लोक रात्रीच का भेटतात? याचा खुलासा झाला पाहिजे. आम्ही ओबीसी आरक्षण बचावासाठी संघर्ष उभा केल्यामुळे त्यांच्या या भेटीचे कारण आम्हाला समजलेच पाहिजे. ही भेट कशासाठी होती, हे आता त्यांनी जाहीरपणे सांगितले पाहिजे.

मंत्री म्हणून तुम्ही संविधानाची शपथ घेतली आहे. त्यामुळे तुम्हाला त्या मनोज जरांगेंकडे का जावे लागले? कोण आहेत जरांगे? तो व्यक्ती संविधानाच्या विरोधात आहे. तो ओबीसींची घरे जाळण्याची भाषा करतो. ओबीसींना मतदान करू करू नये असे सांगतो. एवढे असूनही तुम्ही त्यांची भेट कशाला घेता? हे आम्हाला समजले पाहिजे, असे लक्ष्मण हाके या प्रकरणी धनंजय मुंडे यांना खडेबोल सुनावताना म्हणाले. उल्लेखनीय बाब म्हणजे राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काही दिवसांपूर्वी रात्री आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांची भेट घेतली होती. या दोघांमध्ये बराच वेळ बंद दाराआड चर्चा झाली. पण त्यांच्यातील चर्चेचा तपशील बाहेर आला नाही. लक्ष्मण हाके यांनी आता नेमके यावरच बोट ठेवत धनंजय मुंडे यांना खडेबोल सुनावले आहेत.


## ...तर हे भाजपावाले आज तुरुंगात असते, काश्मीरमधून मल्लिकार्जुन खर्गेंचा हल्लाबोल

श्रीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे सध्या जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान, त्यांनी आज (११ सप्टेंबर) अनंतनाग येथे आयोजित प्रचारसभेत बोलताना भारतीय जनता पार्टीवर सडकून टीका केली. ते म्हणाले, "लोकसभेला आमच्या अजून २० जागा आल्या असत्या तर हे सगळे तुरुंगात असते (आमचे अजून २० उमेदवार निवडून आले असते तर भाजपावाले तुरुंगात असते). ४०० पारच्या घोषणा देणारे लोक अवघ्या २४० जागांवर अडकले. मात्र आमच्या अजून थोड्या जागा यायला हव्या होत्या. तसं झालं असतं तर आताची राजकीय समीकरणं वेगळी असती".

खर्गे म्हणाले, "आम्ही अजून २० जागा जिंकल्या असत्या तर हे सगळे लोक आज तुरुंगात असते. ते लोक केवळ तुरुंगात राहण्यालायक आहेत. भारतीय जनता पार्टीचे लोक केवळ मोठमोठी भाषणं करतात, पण त्याच भाषणांमध्ये दिलेली आश्वासनं पूर्ण करणं त्यांना जमत नाही. भाषण करणं आणि कृती करणं यात खूप फरक आहे. भाजपाने कितीही प्रयत्न केले तरी काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची युती त्यांना तोडता येणार नाही. आम्ही व आमची युती कमजोर होणार नाही. संसदेत आम्ही आमची ताकद दाखवून दिली आहे. आता विधानसभेत त्यांना इंगा दाखवायची वेळ आली आहे. आमची एकजूट झाली आहे, पूर्ण (पान ४ वर)

## मराठवाड्याची तहान भागणार; उल्हास, वैतरणा खोऱ्यांतून पाणी देण्यास मंजूरी, काय आहे प्रकल्प?

पश्चिम वाहिनी नद्यांत अतिरिक्त ठरणारे पाणी मराठवाड्यासाठी वळविता येण्याविषयी विशेष चर्चेत असलेल्या नदीजोड प्रकल्पाचा अहवाल तयार करण्यास राज्य शासनाने हिरवा कंदील दाखवला आहे. सुमारे ६१ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेची मोहोरही त्यावर उमटविण्यात आली आहे. राज्यात प्रलंबित नदीजोड प्रकल्पांच्या यादीत अग्रस्थानी असलेला आणि किमान दोन दशकांपासून केवळ चर्चेच्या प्रवाहात असलेला हा प्रकल्प महानगरी मुंबईसह ठाणे, नाशिक आणि नगर या जिल्ह्यांशी थेट संबंधित आहे. मराठवाड्याचा चेहरामोहरा बदलण्याची क्षमता त्यात असल्याने महाराष्ट्रातील विकास प्रक्रिया गतिमान करणे, तसेच प्रादेशिक समतोल कायम राखण्याच्या दृष्टीने तो महत्त्व राखून आहे. समुद्राच्या दिशेने वाहून जाणारे वैतरणा व उल्हास उपखोऱ्यांतील अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठीची ही मूळ योजना आहे. १९९९मध्ये माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सिंचन आयोगाने ऊर्ध्व गोदावरीचे खोरे तुटीचे असल्याने या खोऱ्यात वैतरणा नदीचे पाणी वळविण्याची शिफारस केली होती. त्याआधीही ही गरज अधोरेखित झाली होतीच. पुढे २०१३ मध्ये केळकर समितीच्या अहवालातही वैतरणा व उल्हास नद्यांचे थेट समुद्राला मिळणारे अतिरिक्त पाणी वळविण्याची शिफारस करण्यात आली. सध्या वैतरणाचे पाणी मुंबईसाठी राखीव असल्याने नार, पार, पिंजाळ, इतर नद्यांवर धरणे बांधून किमान अप्पर वैतरणातील पाणी 'सॅडल डॅम' (मातीचा बांध)मार्गे गोदावरीत आणण्याची शिफारस करण्यात आली. उल्हास खोऱ्यातून ३४.८० आणि वैतरणा खोऱ्यातून १९.९० टीएमसी असे ५७.४० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात येऊ शकते, असा दावा केला जातो. ठाणे आणि नाशिक जिल्ह्यांच्या हद्दीवरील ऊर्ध्व वैतरणा धरणाचे पाणी सॅडल डॅमद्वारे अडविले गेले आहे. या बांधावर सांडव्याची निर्मिती करून वैतरणातून वाहून जाणारे पुराचे किमान दोन टीएमसी पाणी सहज गोदावरी खोऱ्यात आणले जाऊ शकते. नाशिकमधील मुकणे धरणात हे पाणी आणून तिथून पुढे ते गोदावरी खोऱ्यात वळविले जाऊ शकते. अनुकूल नैसर्गिक रचनेमुळे यासाठीचा खर्च अधिक नसल्याचे सांगितले जाते. पहिल्या टप्प्यात किमान हे पाणी मिळाल्यास छत्रपती संभाजीनगर शहरातील आठ-दहा दिवसांनी येणारे नळ दिवसाआड तरी येऊ शकतील. उल्हास आणि वैतरणात पावसाचे अतिरिक्त ठरणारे आणि समुद्राकडे वाहून जाणारे किमान १५ ते १६ टीएमसी पाणी यामार्गे मिळू शकते. अर्थात, मुंबई आणि ठाणे या महानगरांसह नाशिक आणि नगर जिल्ह्याचे सहकार्य व उदार भूमिका त्यासाठी अपेक्षित आहे. हा प्रकल्प खरोखरच कमी कालावधीत पूर्णत्वाला गेल्यास संपूर्ण गोदावरी खोरे सुजलाम सुफलाम होण्यास मदतच होऊ शकते. महाराष्ट्रातील दमणगंगा पिंजाळसह अनेक प्रमुख नदीजोड प्रकल्प तीन दशकांहून अधिक काळापासून निधी आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावापोटी लालफितीत अडकलेले आहेत. गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांबाबतचे चित्र तर आणखी उदासीन आहे. नार-पार-गिरणा नदीजोड या खर्चिक प्रकल्पाला शासनाने नुकतीच मंजुरी दिल्याचा दावा केला असला, तरी केंद्र सरकारने त्याबाबत हात वर केलेले आहेत, हे महत्त्वाचे! असले प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून जाहीर करून त्यासाठी केंद्राचा ९० टक्के निधी मिळविण्याचे सर्वात मोठे आव्हान आहे. ऐन निवडणुकांच्या हंगामात खोळंबलेल्या प्रकल्पांना हवा दिली जाते. केवळ प्रस्ताव, शिफारसी, सर्वेक्षण याभोवतीच फायली फिरत असतात. महाराष्ट्रात लोकानुनयी योजनांवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने निवडणुका पार पडल्यानंतर अशा योजनांना खरोखरच निधी दिला जाईल काय, याबाबत साशंकताच आहे. महानगरी मुंबईला पाणी कमतरता भासणार नाही, याचीच सर्वाधिक काळजी वाहिली जात असल्यानेही अडचणी उद्भवतात. ठाणे, नगर आणि नाशिकमधील राजकीय नेतृत्व आयत्यावेळी काय भूमिका घेईल याचाही नेम नाही. चितळे समितीच्या शिफारसीनुसार स्थानिक पातळीवर नवीन धरणांमध्ये १५ टक्के पाणी राखीव ठेवण्याचे नियोजन असले, तरी प्रत्यक्षात अधिक पाण्याची मागणी होऊन तंटे निर्माण होऊन खोळंबा होतो.



### बाप्पा...

एवढं माझं म्हणणं
बाप्पा जरा ऐकशील का?
तुझ्या समोर नाचणाऱ्यांची
फिरकी तू घेशील का?

काय आपण करतोय
जाण त्यांना येऊ दे,
करायचं काय आहे हे
उघड्या डोळ्यांनी पाहू दे...

अंतरात्म्याशी गाठ
त्यांची पडू देशील का?
खऱ्या ईश्वर भक्तीरसात
यांना न्हाऊन नेशील का?

सिद्धी बुद्धीचं दान
घाल यांच्या पदरी
दीनदुबळ्यांची चूक
घे रे बाप्पा उदरी...

तुझ्या मंगल मुर्तीचा
लागो अखंड ध्यास
तव चरणी अर्पिला
दुर्गचा हा श्वास...

**सौ. दुर्गा देशमाने-राऊत,**
(सहप्रमुख-न्याय देणारा परिवार)
माजलगाव, जि. बीड

### गणराज...

आनंदली वसुंधरा
तुमच्या आगमनाने
शरण चराचर तुम्हा
तन, मन, धनाने...

सद्बुद्धीचे दान
या बालकास द्यावे
तुझ्या छायेमध्ये
अनाथास घ्यावे...

कुमतीचा नाश
करी गणपती गणराज
जीवनास चढवी
सन्मतीचा साज...

अर्पीतसे चरणीं
मोदक अन् दुर्वा
नतमस्तक असे
मी बाळ दुर्गा...

**सौ. दुर्गा देशमाने-राऊत,**
(सहप्रमुख-न्याय देणारा परिवार)
माजलगाव, जि. बीड

# विवेकवादाने माणूस समृध्द होतो

धर्मनिरपेक्ष पुरोगामी विज्ञानवादी विचार मांडणाऱ्या विचारवंतांन्ना विचार मांडतांना मुस्कटदाबी, झुंडशाहीचा सामना करावा लागतो, हे खेदाने म्हणावे लागते. कारण आजही साहित्यिकांवर सातत्याने हल्ले होत आहेत. अभिव्यक्ती, स्वातंत्र्य धोक्यात आले आहे, असे म्हणणे वागवे ठरणार नाही. आजचा काळ ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा काळ, अशा काळात अंधश्रध्दा गाडुन टाकावी आणि आपलं कर्तव्यकर्म अत्यंत विश्वासाने करीत राहावं, बेदरकारपणे. कारण ''माणसाला अंधश्रध्दा दैववादी बनविते आणि दैववाद हा घातक असतो''. विवेकवाद जोपासतांना मनःस्ताप सहन करावा लागतो पण ते कठीण मात्र नक्किच नाही. यासाठी प्रत्येकानेच एकविसाव्या शतकात वाटचाल करतांना विज्ञानाचा आधार घेवून विवेकवादाचा पुरस्कार करायला हवा. कारण विवेकवादाने माणूस समृध्द होतो आणि सत्यापर्यंतही पोचतो. विवेकी विचार करतांना बंडखोर व्हावे लागते. पण त्याला प्रतिसादही मिळतो. थोडा त्रागा सहन करावा लागतो, एवढेच.

२५०० वर्षापूर्वी तथागत सिध्दार्थ गौतमांनी विज्ञानावर आधारीत धम्म सांगतांना ''मी तो सांगतो म्हणुन स्विकारा असे कधीच म्हटले नाही. उलट तुमच्या विचाराला पटेल तरच स्विकारा असे म्हणुन विवेकबुध्दीला आवाहन केले. बौध्दधम्म हा चिकित्सेनंतर सांगितलेला आहे. रोगनिदानानंतर दिलेले औषध आहे. भगवंतानी प्रथम मानवजातीच्या रोगाचे निदान केले. जगात दुःख व दारिद्र्य हे महाभयंकर रोग आहेत. हे या चिकित्सेनंतर शोधलेले उत्तर होय. यालाच बौध्दधम्माचे अधिष्ठान म्हणता येईल. आता प्रश्न उपस्थित होतो की, दुःख व दारिद्र्य हे रोग कोणता धर्म नाहीसा करेल ? जो धर्म हे दुःख व दारिद्र्य नाहीसे करण्याचा प्रभावी आणि परिणामकारक मार्ग दाखवू शकत नाही. तो धर्मच होवू शकत नाही. कारण धर्म हा समाजधारणेसाठी आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे.

व्यक्ती स्वातंत्र्यावरती हल्ला करणे हे लोकशाहीला अभिप्रेत नाही. संवैधानिक लोकशाहीमध्ये तर त्या स्वातंत्र्याचा आदरच केलेला आहे. तरी देखील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्याचे, आपला विचार निर्भिडपणे, अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने प्रत्येकाला दिलेले आहे. माणूस मारून विचार संपवता येत नाहीत, उलट ते अधिक प्रमाणात फोफावत जातात. डॉ. दाभोळकरांच्या मारेकऱ्यांचा अद्याप पत्ता नाही, अकरा वर्ष झालीत तरी शासन शोध कार्यास विलंब किंवा कुचराई करते, शासन मारेकऱ्यांना पाठीशी घालत तर नाही नाही ? असा अनाकलनीय प्रश्न निर्माण होतो, असे समजायला हरकत नाही.

जगात जे जे वैज्ञानिक होवून गेलेत त्यांनी ग्रंथ व शब्दप्रामाण्यवाद नाकारला. त्यामुळेच आपली पिढी सत्यापर्यंत पोहोचू शकली. सत्य जाणून घेण्याच्या एका विशिष्ट भूमिकेतून प्रत्येक माणसाने विचार केला तर विवेकवादी म्हणून जगता येणे शक्य आहे. पण त्यासाठी समाजाच्या निर्माण केलेल्या चौकटी तोडण्याचे धाडस आपल्यात असणे आवश्यक आहे. काही रुढी परंपरांतूनआपली सुटका झाली असे आपल्याला वाटत असले तरीही त्या बाबी समाजात पुन्हा डोंक वर काढु शकतात कारण त्या तात्पुरत्या असतात. त्यामुळेच सातत्याने विवेकवादाचा पुरस्कार करणे आवश्यक ठरते. रुढी परंपरेला खतपाणी घालण्यापेक्षा त्याला मुठमाती देणे तितेकेच गरजेचे आहे. समाजातील अनिष्ट प्रथांवर पुराणमतवादावर अंधश्रध्दांवर प्रहार करुन समाजात विवेकवादाची पेरणी करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, ''साधनाकार'' डॉ. नरेन्द्र दाभोलकर, कॉम्रेड गोविंद पानसरे, डॉ. कलबुर्गी आणि पत्रकार गौरी लंकेश या या चारही विचारवंतांना मारण्यासाठी बुरसट आणि एकाच विचारधारेचे लोक आहेत यात शंकाच नाही.

अंधश्रध्दा निर्मुलन चळवळीला आयुष्यभर विवेकवादाची पाठराखन करणाऱ्या डॉ. दाभोळकरांची हत्या हा मोठा धक्का होता. विचारांची लढाई विचारानेच करण्याची परंपरा असलेल्या आणि पुरोगामीचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात असे घडणे अस्वस्थ करणारे होते. महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशागत झालेल्या महाराष्ट्रान्ने अनेक वैचारिक लढे आणि चळवळी पाहिल्या आहेत.

आपल्या विरोधकांना संपविण्याची परंपरा महाराष्ट्रात नाही. ही स्थिती कां निर्माण झाली याची सर्वांनीच अंतर्मुख होवून विचार करण्याची गरज आहे. मात्र सत्तेचे राजकारण करणाऱ्या कोणालाच तसे करण्याची गरज वाटत नाही. उलट मतपेढयांसाठी प्रतिगामी शक्तींना चुचकारण्याचे राजकारण केले आहे. परिणामी सामाजिक स्वास्थ्य हरवत असुन अनिष्ट प्रथा परंपराकडे जातीय आणि धार्मिक चष्म्यातून पाहिले जात आहे. आपल्या एखाद्या मुद्याला विरोध करणारा शत्रुच असल्याची प्रवृत्ती वाढत आहे. दाभोळकर, पानसरे यांच्या हत्येमागे हीच प्रवृत्ती आणि विकृती आहे. विवोकाने विचार करणे, आपल्या विरोधकालाही त्याचे विचार व्यक्त करण्याची संधी देणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य राखणे, विज्ञानाच्या कसोटयांवर तपासुन पाहणे हे सारे हरवू लागले की काय असा प्रश्न त्यामुळे पडतो. दुर्देव असे आहे की हे सारे कळत असुनही समाज, राजकिय पक्ष डोळयावर झापडं बांधुन त्याच्याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

महाराष्ट्र भर तथा महाराष्ट्राबाहेर ही फिरतांना अशिक्षित, अर्धशिक्षित व उच्चशिक्षित समाज श्रध्देच्या नावाखाली अंधश्रध्देला बळी पडतो आहे व त्यामुळे त्याचे ऐच्छिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक नुकसान होत आहे, याची जाणीव डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांना झाली होती, म्हणुनच या बाबी संविधानाच्या तत्वान्ने कायद्याचा आग्रह धरीत थांबविण्याचा आग्रही प्रयत्न त्यांनी केला होता. या प्रयत्नाच्या जवळपास अंतिम टप्प्यावर ते असतांना त्यांची जाणीवपूर्वक हत्या करण्यात आली.

विज्ञानाच्या कसोटीवर आपल्या श्रध्दा तपासुन घेत वाटचाल करण्यासाठी आवश्यक असलेल्या चर्चेचं व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याची खरी गरज आहे. याच संदर्भात राजश्री शाहु महाराजांनी तर अंधश्रध्देवर कडाडुन हल्ला चढवत म्हटले होते की, अंधश्रध्दा हा मनुष्याच्या प्रगतीतील अडथळा असुन धार्मिक रुढी आणि प्रथांमुळे मनुष्य आपलं मनुष्यत्व गमावतो आणि पशुप्रमाणे वर्तन करु लागतो. ईश्वरावर श्रध्दा ठेवून अंधश्रध्दा टाळता येते, हे ही निक्षुण सांगितले.

एकविसाव्या शतकात आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे मोठी प्रगती साधत असतांना विज्ञानाचा पाया असलेलं तर्कसुत्र विसरलो, तर विनाश अटळ आहे. अशा या काळात आपण वैज्ञानिक दृष्टिकोणाचा अंगीकार करण्यासाठी प्रयत्न करणे याचं अनन्यसाधारण महत्व आहे. वैज्ञानिक दृष्टिकोण ? विज्ञान आपल्याला प्रश्न विचाराला शिकवतं. तर्क आणि अनुभवाच्या आधारे गोष्टींवर विश्वास ठेवायला शिकवतं. विज्ञान सांगतं-अंतिम काहीच नसतं, तर्काच्या कसोटीवर जे उतरेल ते सत्य. म्हणुनच विज्ञानात नवनवीन शोध व प्रगती होत राहते. मुळात विचार कसा करावा, तर्काचा अवलंब कसा करावा आणि निष्कर्षाप्रत येतांना काय दक्षता घ्यावी, या सत्याबाबत विज्ञान दिशादर्शक ठरते आणि नेमकं हेच डॉ. नरेन्द्र दाभोळकरांच्या ''ठरलं डोळस व्हायचंय'' या पुस्तकात सत्यनारायण ची पुजा ही एक अंधश्रध्दा आहे, असा बेडरपणे उल्लेख केला आहे. हे सर्व थोतांड आहे. समाजाच्या मानगुटीवर भूत पिशाच्च दोलायमान होत आहे. तेव्हा त्या पाशातून बाहेर निघण्यासाठी विवेकाची कास धरायला हवी. विवेकी वागण्याची मोठी किंमत चुकवावी लागते हे टाहो फोडून सांगत असतांनाच त्यांचा घात झाला. कारण हेच नको होतं त्या करंटयांना, पण आता तरी विवेकवाद जोपासण्याची समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. सदविवेकबुध्दीने सारासार विचार करुन विवेकी विचार आत्मसात करण्याची गरज आहे. समाजातील प्रत्येकांनी वैफल्यग्रस्त न राहता विज्ञाननिष्ठ बनले पाहिजेत, ही काळाची आहे.

एखादे कर्मकांड तर्काला पटत नाही म्हणून ते करु नये असे बुध्दिला वाटते, पण परंपरेने चालत आल्यामुळे ते केलेच पाहिजे असा भावनेचा हट्ट असतो. अशी तर्कविहीन मानसिकता म्हणजे श्रध्दा. श्रध्दा आणि अंधश्रध्दा यात तत्वतः भेद नाही पण ज्या श्रध्देपायी माणसाची लक्षणीय प्रमाणात अधिक हानी होते त्या श्रध्देला अंधश्रध्दा म्हणता येईल. याचाच उलगडा डॉ. दाभोळकर करीत असत पण त्याचा विप्रर्यास गेला गेला आणि त्यांना प्राणास मुकावे लागले, माथेफिरुने असा घात केला. स्वतंत्र्य विचार करण्याची प्रवृती वाढली पाहिजे कारण परिवर्तन जगाचा शाश्वत नियम आहे, त्यामुळे विज्ञाननिष्ठ, तर्कनिष्ठ बनण्याची गरज आहे.

**– प्रभाकर सोमकुवर**
**नागपूर**

***

# स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल व टिव्ही पाहण्यास बंदी! हाच नियम भारतात सुध्दा लागु व्हायला हवा

आज फक्त स्वीडनमध्येच नाही तर संपूर्ण जगात टिव्ही आणि मोबाईलच्या अती वापरामुळे दुष्परिणामाला सुरूवात झाली आहे.कारण टीव्ही आणि मोबाइलने लहान मुलांसह संपूर्ण मानवजातीला रीस्ते नाते तोडून आपलेसे करून ठेवले आहेत. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावले आहे.टिव्हि आणि मोबाइलचा दुष्परिणाम लहान मुलांवर मोठ्या प्रमाणात होऊन पुढील आयुष्यासाठी धोका निर्माण करण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे.कारण यामुळे अनेक नवीन -नवीन आजार जन्म घेऊ शकतात आणि घेत आहे.आधुनिक काळात लहान मुले रडायला लागली की त्यांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला जातो आणि ही प्रथा जगातील अनेक देशांमध्ये आहे.याचा दुष्परिणाम स्वीडनमध्ये दिसायला लागला आहे.त्यामुळे आता स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.एका पाहणीनुसार १३ ते १६ वयोगटातील स्वीडिश किशोरवयीन मुले शाळेबाहेर पडल्यानंतर दररोज सरासरी साडेसहा तास मोबाइल, टीव्हीवर घालवत आहेत.८ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर अमेरिकेतील किशोरवयीन मुले घालवत आहेत. हीबाब भविष्यासाठी अत्यंत घातक आहे.देशांच्या आरोग्य संस्थेच्या मते मोबाईल आणि टिव्ही स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करीत असल्याने लहान मुलांना डिजिटल मिडिया आणि टेलिव्हिजन पासुन पूर्णपणे दुर ठेवले पाहिजे.मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे कौटुंबिक संवाद आणि शारीरिक व्यायाम बंद झाले आहे.आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल आणि टिव्हीने हिरावून घेतले आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत. त्याचप्रमाणे शाळांमध्ये व ऑनलाईन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.याचेच प्रायश्चित्त आज स्वीडिश किशोरवयीन मुले भोगत आहेत.ही परिस्थिती फक्त स्वीडनमध्येच नाही तर भारतासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने सुध्दा दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही.कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या व टिव्हीच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते. स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल ऍक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही.त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ऍक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ऍक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन ॲटॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते. ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे.मानवाला मोबाईलमुळे व टिव्हीमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईल व टिव्हीच्या स्क्रीनमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे.त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.''अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात. आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो. आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई- वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल ऍक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजार पटीने आपल्याला यातना किंवा दुःख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते ''कहा गये ओ दिन''स्वीडनमध्ये मोबाईल आणि टिव्हीचे लहान मुलांवर होत असलेले दुष्परिणाम पहाता स्वीडन सरकारने काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत.यावरून स्पष्ट होते की टीव्ही आणि मोबाइलने स्वीडनमध्ये भयावह रूप धारण केले आहे.त्यामुळे यापासून आपण सर्वांनीच सावधगिरी बाळगली पाहिजे.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर**

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

# वारकरी संप्रदायाकडून समाज घडविण्याचे कार्य-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर यांचा ९३ वा आणि ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांचा ७० वा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न



पुणे दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- वारकरी संप्रदाय हा वारकरी पंथाला आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा, सन्मार्गाची दिशा दाखविणारा असून समाज घडविण्याचे कार्य वारकरी संप्रदाय करतो, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आळंदी येथे फ्रुट वाले धर्मशाळा येथे झालेल्या ह.भ.प मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या व ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते ह.भ.प कुरेकर महाराज यांना शांतीब्रह्म पुरस्कार आणि ह.भ.प. ढोक महाराज यांना तुलसीदास पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच संतपूजन करण्यात आले.

कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. संदीपान महाराज शिंदे (हासेगावकर), ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार प्राप्त ह. भ. प. संजय महाराज पाचपोर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, आजचा कार्यक्रम आपल्या आयुष्यातला आगळा वेगळा कार्यक्रम आहे. संतांचे पूजन करणे यापेक्षा वेगळे भाग्य नाही. ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर, ह.भ.प. रामराव महाराज ढोक आणि वारकरी संस्थेचे योगदान मोठे आहे. शिकवणाऱ्याला मानधन नाही आणि शिकणाऱ्यालाही शुल्क नाही अशी जगात नसेल अशी ही संस्था आहे. १०७ वर्षे झालेली ही संस्था आपले नाव जपण्याचे काम करत आहे. एक पिढी घडविण्याचे काम ही संस्था करत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी संस्थेचा आणि ह.भ.प. कुरेकर महाराज आणि ह.भ.प. ढोक महाराज यांचा सन्मान केला. वारकरी मंडळ, वसतिगृह यातील तांत्रिक अडचणी लवकरच दूर करण्यात येईल, असेही आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

गेल्या २ वर्षात शासनाने ६०० च्यावर निर्णय घेतले, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आम्ही नियोजन करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. आपणदेखील सामान्य शेतकऱ्याचा मुलगा आहे. आपल्यालाही गरिबी माहिती आहे. आपल्या स्तरावरचे अर्थकारण सांभाळणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते. म्हणून ही योजना सुरू केली. माझी लाडकी बहिण योजनेसाठी वर्षभराची तरतूद केली असून दरमहा निश्चित रक्कम मिळणार आहे. या योजनेबरोबरच लेक लाडकी लखपती योजना, मुलींना व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, एस. टी. प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना आदी योजना राबवित आहे.

त्यांनी पुढे सांगितले, शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ आदींसाठी आतापर्यंत १६ हजार कोटी रुपये नुकसान भरपाई दिली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीला राज्याच्या नमो महासन्मान योजनेची ६ हजार रुपयांची जोड देऊन वर्षाला एकूण १२ हजार रुपये देण्यात येत आहेत. १ रुपयात पीक विमा देणारे हे देशातील पहिले सरकार असून ७.५ एच. पी. पर्यंतच्या शेतीपंपाचे वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य शासनाने एकीकडे बंद पडलेले प्रकल्प सुरू केले. पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक, अटल सेतू असे विकासाचे प्रकल्प राबवित असून हाताला रोजगार मिळण्याच्या दृष्टीने नवीन उद्योग आणण्याचे काम केले जात आहे. महाराष्ट्र उद्योग, परदेशी गुंतवणुकीमध्ये आघाडीचे राज्य असून देशातील एकूण परदेशी गुंतवणुकीपैकी ५२ टक्के परदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे, असे ते म्हणाले.

लाडकी बहीण योजनेबरोबर लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यक्रम सुरू केला आहे. त्यांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी प्रशिक्षण तसेच विद्यावेतनही मिळणार आहे. यात आतापर्यंत १ लाख ५० हजार उमेदवारांनी अर्ज भरले असून त्यांना नियुक्ती पत्रे दिली आहेत. त्यामुळे एकीकडे विकास कार्य आणि दुसरीकडे कल्याणकारी योजना अशी सांगड घालण्याचे काम सरकार करत आहे.

सरकार राज्यातील सर्वसामान्यांना सुविधा देण्याचे काम करत आहे. गड किल्ल्यांच्या विकास, तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याचे धोरण शासनाने हाती घेतले आहे. चंद्रभागा, इंद्रायणी, गोदावरी या नद्यांच्या प्रदूषण मुक्तीचे आराखडे करत आहोत. महाराष्ट्राला शेती, सिंचन, शिक्षण, उद्योग, आरोग्य, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान आदींमध्ये आधुनिक बनविण्याचा प्रयत्न करत आहोत.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, राज्यात वारकरी महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. प्रत्येक दिंडीला अनुदान, वारकरी बांधवांसाठी साहित्य याशिवाय येणाऱ्या काळात किर्तनकारांना सन्मान निवृत्तीवेतन योजना सुरू करण्यात येणार आहे. त्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून पुढील काम सुरू आहे, असेही ते म्हणाले.

ह.भ.प. मारोती महाराज कुरेकर म्हणाले, संतांच्या शिकवणीचा, वाङ्मयाचा विसर पडू नये यासाठी काम करणारी ही वारकरी शिक्षण संस्था आहे. वारकऱ्यांना आध्यात्मिक समाधान मिळवून देण्यासाठी संस्था कार्य करत आहे. संस्थेच्या गरजा शासनामार्फत पूर्ण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ह.भ.प. रामराव महाराज ढोक म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारकऱ्यांच्या सन्मान केला. हजारो कीर्तनकार निर्माण करण्याचे काम शांतिब्रह्म ह.भ.प. मारोती महाराज कुरेकर यांनी केले. या संस्थेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. शासन रस्ता तयार करते, त्यावर कसे चालावे हे वारकरी संप्रदाय शिकवतो, असेही ते म्हणाले.

इतर कार्यक्रमात आयोजकांच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत होते. मात्र या कार्यक्रमात ज्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा होत आहे अशा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तेच ह.भ.प मारुती महाराज कुरेकर, ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्यासह वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले, हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. ह. भ. प. बाळकृष्ण महाराज शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नतूसिंग राजपूत यांनी लिहिलेल्या वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने प्रकाशित सार्थ गाथेच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला वारकरी संप्रदायातील मान्यवर, वारकरी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्टोव्हक्राफ्टने पिजन एअरफ्यूजन एअर-फ्रायर रोटिसेरी ओव्हनचे अनावरण केले; स्वयंपाकातील एक गेम-चेंजर

मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- स्वयंपाकघरातील नवकल्पनांमध्ये अग्रणी असलेल्या स्टोव्हक्राफ्टने आपल्या नवीनतम ऑफर अंतर्गत पिजन एअरफ्यूजन एअर-फ्रायर रोटिसेरी ओव्हनच्या लॉन्चची घोषणा केली आहे. हे अत्याधुनिक उपकरण स्वयंपाकातील एक गेम-चेंजर ठरणार असून, यामध्ये एअर फ्रायर आणि ओटीजीच्या कार्यक्षमतेचे संयोजन आहे. १२-लिटर क्षमता असलेल्या या उपकरणात प्रगत रोटीसेरी क्षमतांसह एक कॉम्पॅक्ट आणि स्लीक डिझाइन आहे.

एअरफ्यूजन आरोग्यदायी आहाराच्या दृष्टीने विशेषत: उपयुक्त आहे. त्याचे ३६० अंश उष्णता अभिसरण तंत्रज्ञान आणि ९५% कमी तेल वापरामुळे, ते विविध प्रकारच्या स्वयंपाकाच्या कामांमध्ये उत्कृष्ट परिणाम देतो. एअरफ्यूजन एअर फ्रायिंग, रोस्टिंग, टोस्टिंग, बेकिंग, आणि ग्रिलिंगसारख्या कार्यांसाठी तयार केलेले आहे, जे प्रत्येक स्वयंपाकघरात आवश्यक आहे.

यात एलईडी डिजिटल टचस्क्रीन सुलभ वापरकर्ता इंटरफेस प्रदान करते, जेणेकरून अचूक तापमान नियंत्रण (८० ते २०० सेल्सिअस) आणि लवचिक वेळेची सेटिंग्स वापरता येतात. याशिवाय, आतील प्रकाशासह पारदर्शक कुकिंग विंडोने सहज निरीक्षण करता येते. यामध्ये ९ सोप्या प्री-सेट पाककृती आहेत, ज्यात फ्रेंच फ्रायज, पिझ्झा, बेकिंग, रोटीसेरी आणि डिहायड्रेटर यांचा समावेश आहे.

स्टोव्हक्राफ्ट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र गांधी यांनी या उपकरणाच्या लॉन्चसाठी उत्सुकता व्यक्त केली आहे,

आणि ते म्हणाले, "आम्ही आमच्या ग्राहकांना नाविन्यपूर्ण आणि गुणवत्तेच्या प्रतीक असलेल्या एअरफ्यूजनची सादरीकरण करत आहोत. हे उपकरण स्वयंपाक करण्याच्या अनुभवात एक नवीन आयाम घालणार आहे."

## ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घ्यावा-पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचे आवाहन

कोल्हापूर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी देण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" सुरु करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. ही योजना ज्येष्ठ नागरिकांना राज्य व देशातील तीर्थ स्थळांना जाऊन मन:शांती तसेच आध्यामिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी राबविण्यात येत आहे. या योजनेचा जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना समितीचे अध्यक्ष तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले आहे.

तीर्थदर्शन योजनेत राज्य व देशातील सर्व धर्मीयांतील देवस्थान, चर्च, दर्गासह १०५ क्षेत्रांचा समावेश आहे. या योजनेनुसार ज्येष्ठ नागरिकांना प्रतिव्यक्ती ३० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार असून त्यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास व्यवस्था खर्चाचा समावेश आहे. तसेच विभागाने ठरवून दिलेल्या निकष, सुविधांव्यतिरिक्त इतर सुविधा घ्यायच्या असतील तर त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भाराची जबाबदारी संबंधित ज्येष्ठ नागरिकाची राहील.

लाभार्थ्यांची निवड प्रत्येक ठिकाणच्या प्रवासासाठी जिल्हानिहाय कोटा निश्चित केला जाईल, ज्यामध्ये अर्जदारांच्या संख्येसह त्या जिल्हाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिभार देऊन कोटा निश्चित केला जाईल. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जांच्या उपलब्धतेवर आधारित पारदर्शक पध्दतीने लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड केली जाईल. कोट्यातील १०० टक्के अतिरिक्त लोकांसाठी प्रतिक्षा यादी देखील तयार केली जाईल. दि. ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्याकरीता कमाल १ हजार (एक हजार) पात्र लाभार्थ्यांचा कोटा निश्चित करण्यात येत असून कोट्याच्या कमाल मर्यादेत तसेच प्रति लाभार्थी ३० हजार रुपये (रुपये तीस हजार) च्या कमाल मर्यादेत शासनाने दि. १४ जुलै २०२४ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या तीर्थक्षेत्रांमधून तीर्थदर्शन यात्रा (टूर पॅकेज) निश्चित करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस असतील.

निवडलेले प्रवासी आणि प्रतीक्षा यादी विभागाच्या पोर्टलवर (दि. ३१ ऑक्टोबर २०२४ नंतर) जिल्हाधिकारी कार्यालय आणि समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि योग्य वाटेल अशा इतर माध्यमांद्वारे प्रसारित केली जाईल. जर पती-पत्नीने स्वतंत्रपणे अर्ज केला असेल आणि एकाची लॉटरीत निवड झाली असेल आणि दुसऱ्या जोडीदाराची लॉटरीत निवड झाली नसेल, तर जिल्हास्तरीय समिती त्यांना किंवा तिला यात्रेवर पाठवण्याचा निर्णय घेऊ शकतील.

अर्ज करण्याची प्रक्रिया - योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. ३१ ऑक्टोबर २०२४ पूर्वी ऑफलाईन व तद्नंतर योजनेचे अर्ज पोर्टल, मोबाईल ॲपद्वारे, सेतू केंद्राद्वारे ऑनलाईन भरले जाऊ शकतात. त्याकरीता पुढील प्रक्रिया विहित केलेली आहे.

पात्र ज्येष्ठ नागरिकांस या योजनेसाठी ऑफलाईन अर्ज दि. ३१ ऑक्टोबर २०२४ पूर्वी करता येईल. दि. ३१ ऑक्टोबर नंतर या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करावा लागेल. अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे- ऑफलाईन अर्ज, लाभार्थ्याचे आधार कार्ड, रेशनकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, जन्म दाखला (त्याऐवजी १५ वर्षापुर्वीचे रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला यापैकी कोणतेही प्रमाणपत्र, ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येईल.) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किंवा अंत्योदय अन्न योजना/ प्राधान्य कुटुंब योजना/ वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखाच्या आत असलेले मात्र प्राधान्य कुटुंब नसलेले शिधापत्रिकाधारक, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईचा मोबाईल क्रमांक, योजनेच्या अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, ट्रॅक्टर वगळून इतर चारचाकी वाहन असल्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेकरीता जिल्हास्तरीय समिती ही पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली आहे. ही समिती अर्जाची छानणी करुन पात्र व्यक्तीची निवड करणार आहे. जिल्ह्याच्या दिलेल्या पात्र ज्येष्ठ नागरिकांच्या कोट्यापेक्षा अधिक अर्ज आल्यास लॉटरीद्वारे पात्र यात्रेकरुंची निवड होणार आहे. तीर्थ दर्शन प्रवासासाठी रेल्वे, बस किंवा टुरिस्ट एजन्सी कंपन्यांची निवड करण्यात येणार आहे. संबंधित प्रवासी एजन्सी कंपनी या तीर्थ यात्रेचे नियोजन करणार आहेत. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑफलाईन अर्ज दि. ३१ ऑक्टोबर २०२४ अखेर ऑफलाईन अर्ज सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, विचारेमाळ, बाबर हॉस्पिटल शेजारी, कोल्हापूर येथे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील मच्छीमारांसाठी कार्यशाळा संपन्न



परभणी दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- लक्ष्मणराव इनामदार नॅशनल अकॅडमी फॉर को ऑपरेटिव्ह रिसर्च अँड डेव्हलपमेंट प्रशिक्षण केंद्र, एन.सी.डी.सी पुणे, सहकार मंत्रालय आणि मत्स्य व्यवसाय विभाग तसेच ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मच्छीमारांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी व्यासपीठावर सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी अश्विनी पाटील तसेच सहाय्यक सहकारी संस्था दुग्ध शिवाजी गिनगिने, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी लटपटे उपस्थित होते.

पाण्याचे महत्व सांगताना जलसंपत्ती व मत्स्यपालनाचे महत्व अधोरेखित केले. गुणवत्तापूर्ण बीजनिर्मिती, बीज संकलन त्यांची उपलबधता हा मत्स्य व्यवसायातील यशाचा गाभा आहे. मच्छीमार बांधवांनी कोल्ड स्टोरेज, मत्स्य विपणन, माशांची बाजारपेठेतील उपलब्धता या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मत्स्य व्यवसायात महिलांचे प्रमाण अत्यल्प असून महिलांनी एकत्र येऊन सोसायट्या स्थापन कराव्यात, अशी अपेक्षा प्रमुख पाहुणे शेख मोहम्मद बाबर यांनी व्यक्त केली.

मत्स्य शेतकरी उत्पादक संस्थासाठी असलेल्या विविध योजनांसाठी प्रस्ताव कसे तयार करायचे यांसदर्भात अमोद साळगावकर यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. मच्छीमार बांधवांसाठी झालेल्या सादरीकरणांमध्ये उपनिदेशक पुनित गुप्ता यांनी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या विविध योजनांची तपशीलवार माहिती दिली.

प्रशिक्षणादरम्यान श्रीमती अश्विनी पाटील यांनी सादरीकरण केले. पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेची यावेळी त्यांनी माहिती दिली. मच्छीमारांनी पारंपरिकतेला आधुनिकतेची आणि तंत्रज्ञानाची जोड द्यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत आयोजित या कार्यशाळेला प्रशिक्षणादरम्यान मत्स्यव्यवसाय विभागाचे तसेच जिल्ह्यातील मच्छिमार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपनिदेशक सुनिल शिंदे यांनी प्रास्ताविक केले. तर महेश कडलग यांनी आभार व्यक्त केले.

## मराठवाडा बटालियनमध्ये ५३ सैनिकांसाठी २३ सप्टेंबरला पदभरती

परभणी दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मराठवाडा पर्यावरण बटालियन १३६ इन्फ्रंट्री बटालियन टीए इको, महार (एम ओ ई एफ आणि सीसी) आणि महाराष्ट्र राज्य वन विभागाच्या माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांच्या (अकाली निवृत्तीसह) २३ ते २८ सप्टेंबर २०२४ दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे ५३ पदांसाठी पदभरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महार २३ ते २८ सप्टेंबर २०२४ या कालावधीत संभाजीनगर मिलट्री कैंट येथे माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी (समाविष्ट महिला) भरती मेळावा आयोजित करण्यात आहे. (एम ओ ई एफ आणि सीसी) आणि राज्य वन विभागाचे सेवानिवृत्त १३६ इन्फंट्री बटालियन टीए इकौ, महार मध्ये सहभागी होण्यासाठी स्वयंसेवा करणारे सर्व पात्र उमेदवारांनी वेळापत्रकानुसार २३ सप्टेंबर रोजी साडेपाच वाजता संभाजी नगर मिलट्री कैंट (सर्वत्र स्टेडियम) येथे शारीरिक फिटनेस चाचणीसाठी उपस्थित राहण्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

यामध्ये उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. तसेच त्याची देशभरात कुठेही नोकरीसाठी जाण्याची तयारी असावी. ही पदभरती संभाजीनगर येथील छावणी परिसरात होणार असून, सैनिक (जीडी) ४२, लिपीक ६, हाऊस कीपर, ब्लॅकस्थिम, मेस कीपर, आर्टीसन आणि स्टेवार्ड पदासाठी प्रत्येकी एक अशी एकूण ५३ पदांसाठी भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

१३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महारमध्ये भरतीसाठी पुढीलप्रमाणे पात्रता अटी असून, माजी सैनिकांसाठी, एमओईएफ आणि सीसी आणि महाराष्ट्र राज्य वन विभागाच्या माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी (अकाली सेवानिवृत्तांसह) किमान वयोमर्यादा नाही. तथापि, ते सेवानिवृत्ती/ डिस्चार्ज झाल्यापासून पाच वर्षात आतील असावा. माजी सैनिक () ५० वर्षे वयापर्यंत सेवा करु शकतात. वैद्यकीय श्रेणीमध्ये आकार-१ (-१), असून, तो आज्ञाधारक असावा. माजी सैनिक (केवळ पेन्शनधारक) आणि माजी महिला एमओईएफ आणि सीसी आणि महाराष्ट्र राज्य वन विभागाचे कर्मचारी एमओईएफ आणि सीसी आणि महाराष्ट्र राज्य वन विभागामध्ये किमान २० वर्षे सेवा झालेली असावी. तसेच तो सेवानिवृत्ती/ डिस्चार्जच्या तारखेपासून पाच वर्षाच्या आत असावी. त्याची उंची ही १६० सें.मी. (गोरखा, गढवाली आणि आसामींच्या बाबतीत १५२ सेमी)असावी.

एमओईएफ आणि सीसी आणि राज्य वन विभागाच्या माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी १५० सें.मी. आणि माजी सैनिकांसाठी किमान ५० किलो, माजी महिलांसाठी किमान ४२ किलो वजन असावे. छाती माजी सैनिकांसाठी ८२ सें.मी. (विस्तार५ सें.मी.) आणि स्त्रिया ०५ सें.मी. छातीचा विस्तार करण्यास सक्षम असावीत. शारीरिक तंदुरुस्ती चाचणीमध्ये पुरुषांसाठी १.६ कि.मी. निर्दिष्ट वेळेत धावणे, ८ ते ९ फूट खंदकातून उडी मारून पार करण्यास सक्षम असावा. पुल-अप्समध्ये स्वत: कडे खेचण्यास सक्षम असावा. अडथळ्यांमधून तसेच उंच प्लॅटफॉर्मवर चालण्यास सक्षम असावा. माजी महिलांसाठी मुलाखत, महिला उमेदवारांसाठी वनीकरणाशी संबंधित उपक्रम आणि रोपवाटिकेतील प्रवीणता चाचणीद्वारे व्यवस्थापन आणि वैद्यकीय चाचणी करण्यात येणार आहे.

पेन्शन पेमेंट ऑर्डर, डिस्चार्ज बुक, अलीकडील पासपोर्ट आकाराच्या रंगीत छायाचित्रांच्या आठ प्रती, शिक्षण प्रमाणपत्र, निवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड सोबत असावे. उमेदवार वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असावे. निवडलेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणी करावी लागेल आणि शारीरिक चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महारमध्ये सादर केलेली सेवा कोणत्याही प्रकारची पात्रता सेवा मानली जाणार नाही. उमेदवारांना सेवानिवृत्ती वेतन मिळणार नाही. नावनोंदणी पूर्णपणे गुणवत्तेवर आधारित आणि उपलब्ध रिक्त पदांनुसार राहणार असल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# स्वच्छ, सुंदर आणि विकसित जिल्ह्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करा-राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन



नाशिक दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी खूप वाव आहे. शहराचा विस्तार होत असताना योग्य नियोजन आणि उत्तम पायाभूत सुविधांच्या विकासावरही लक्ष द्यावे लागणार आहे. त्यादृष्टीने स्वच्छ, सुंदर आणि विकसित जिल्ह्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

शासकीय विश्रामगृहात वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांसोबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, आदिवासी विकास आयुक्त नयना गुंडे, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा खत्री, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, जिल्ह्याच्या अविकसित भागाच्या विकासावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. त्यादृष्टीने क्षेत्र निश्चित केल्यास शासन स्तरावरून सहकार्य मिळविणे सोयीचे होईल. कृषी आणि पशुधनाच्या विकासावरही विशेष लक्ष देऊन ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासालाही चालना देण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

औद्योगिकदृष्टीने विकसित होणाऱ्या नाशिकसारख्या शहरात तंत्रशिक्षणासाठी आधुनिक सुविधांनीयुक्त संस्था असणे गरजेचे आहे. आयआयएम, आयआयटी दर्जाच्या सुविधा असणाऱ्या तंत्रशिक्षण आणि व्यवस्थापन संस्था येथे गरजेच्या आहेत. शासनस्तरावरही याबाबतचा विचार करण्यात येईल, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन सांगितले.

राज्य शासनाच्या विविध पथदर्शी योजनांच्या जिल्ह्यात होत असलेल्या अंमलबजावणीबाबत राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सविस्तर माहिती घेतली. महसूल दस्तावेजचे डिजिटायझेशन, राज्यात सेवा हक्क कायद्याची चांगल्यारीतीने अंमलबजावणी होत असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. नागरिकांच्या हक्कांची योग्यरितीने जपणूक व्हावी. बचत गटांना आदिवासी भागात पोषण आहार पुरवठा करण्याबाबत नियोजन करावे. वायनरीच्या गरजेनुसार द्राक्ष पिकाबाबत संशोधनाला चालना देण्यात यावी, कांदा प्रक्रिया उद्योगाबाबतही प्रयोग व्हावेत. त्यासाठी बाजाराची मागणी आणि पुरवठा साखळीचा अभ्यास व्हावा. शासन प्रक्रिया उद्योगांना सहकार्य करीत असल्याने अशा उद्योगांना चालना देता येईल. यादृष्टीने प्रयत्न करण्याची सूचना त्यांनी केली. कृषी विकासाच्या बाबतीत विशेषतः द्राक्षे आणि कांदा पिकाच्या बाबतीत अधिक संशोधन होण्याच्यादृष्टीने कृषी विद्यापीठांशी सहकार्य करून त्याला गती द्यावी, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

जल जीवन मिशन, पीएम किसान, राज्य शासनाच्या विविध योजनांची माहितीही त्यांनी घेतली. नाशिक शहराने स्वच्छ भारत अभियानात यशस्वी होण्यासाठी उत्तम नियोजन करावे, अशी सूचनाही त्यांनी केली. यावेळी, राज्यपालांनी जिल्हा प्रशासन महानगरपालिका, आदिवासी विकास, पोलिस विभाग यांच्या संदर्भातील विविध बाबीवर चर्चा केली.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी, शहर आणि लगतच्या परिसर विकासासाठी पायाभूत बृहत आराखडा करण्याची गरज व्यक्त केली. येथील परिसर पर्यावरणाच्यादृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे त्याची काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. याबाबत आराखडा तयार करून सादर करण्याची सूचना राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी केली. कुंभमेळ्याची पूर्वतयारी करतांना विकासकामांचे योग्य नियोजन करावे, अशी सूचना राज्यपालांनी केली.

जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी, जिल्ह्यात तंत्रशिक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावरील संस्था स्थापण्याचे प्रयत्न असल्याचे सांगितले. जिल्ह्याला पर्यटन विकासासाठी मोठा वाव आहे. त्यावर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यात सुरू असलेल्या विमानसेवेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरात रोजगार निर्मितीच्या अधिक संधीसाठी आयटी पार्क उभारण्याचा प्रयत्न असल्याची माहिती त्यांनी दिली. या बैठकीनंतर राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीशी संवाद साधत जिल्ह्याच्या विकासाबाबत चर्चा केली.



# अटल बांधकाम कामगार आवास योजनेंतर्गत जागा खरेदीसाठी १ लाख रूपये अर्थसहाय्य-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- बांधकाम कामगार मंडळामार्फत बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. अटल बांधकाम कामगार आवास योजनेंतर्गत स्वत:ची जागा नसलेल्या कामगारांना जागा खरेदीसाठी ५० हजार रूपयांचे अर्थसहाय्य देण्यात येते. यामध्ये दुपटीने वाढ करून हे अर्थसहाय्य १ लाख रूपये करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आमदार चंद्रशेखर बावनकुळे व आमदार आशिष जयस्वाल यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विविध विषयांचा आढावा घेतला.

कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून बैठकीमध्ये सहभाग घेतला. बैठकीस आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंघल, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, नगर रचनाकार प्रतिभा भदाणे आदी उपस्थित होते.

जिल्हा नियोजनच्या निधीतून अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेंतर्गत सौर विद्युत संच देण्याच्या सूचना देत उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जिल्हा नियोजनमधील अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी राखीव निधीतून रस्ते, नाले, प्रकाश व्यवस्था ही कामे करण्यात येतात. मात्र या कामांची आता पुर्नरावृत्ती होत आहे. त्याऐवजी पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री सौरघर योजनेंतर्गत सौर विद्युत संच दिल्यास वीज देयकातून या लाभार्थ्यांची कायमची सुटका होईल. तसेच अनुसूचित जाती योजनांसाठी असलेल्या जिल्हा नियोजन निधीतून जिल्हा परिषद व राज्यस्तरीय यंत्रणांना काम करण्याची परवानगी देण्यात यावी. आदिवासी क्षेत्रातील शेतकऱ्यांना सौर पंपासह विंधन विहिरी घेण्यासाठी परवानगी देण्यात यावी, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आदिवासी गावांना वन्य प्राण्यांपासून बचावासाठी कुंपण देण्यात यावे. यासाठी असलेली लोकसहभागाची अट रद्द करावी. पांदण रस्त्यांना गती देण्यासाठी सर्वंकष असा शासन निर्णय जारी करावा. मानव विकास निधीची कामे राज्यात १२५ तालुक्यांमध्ये करण्यात येतात. या निधीतील कामांसाठी तांत्रिक मान्यतेचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात यावे. तसेच महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा नियोजन निधीतील कामांचे तांत्रिक मान्यता प्रस्ताव मंजूरीचे अधिकार जिल्हास्तरीय यंत्रणेकडे देण्यात यावे. सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांव्यतिरिक्त घरकुले असणाऱ्या अन्य लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे नियमित करून देण्याची कार्यवाही करावी.

याव्यतिरिक्त प्रत्येक तालुक्यात स्थापन करण्यात आलेल्या कामगार सुविधा केंद्रातून कामगारांच्या सर्व योजना, अर्ज स्वीकृती, बांधकाम कामगाराबाबत ९० दिवसांचे प्रमाणपत्राची कार्यवाही करावी. असे निर्देशही त्यांनी दिले. यासह बैठकीत नागपूर जिल्ह्यात मोदी आवास योजनेतून वाढीव घरकुलांचे उद्दिष्ट देणे, मोदी आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती, कामगारांना देण्यात येणाऱ्या वस्तूंमध्ये कामगारांच्या गरजेप्रमाणे आवश्यक वस्तूंचा समावेश करणे अन्य विषयांवर चर्चाही करण्यात आली. बैठकीला संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# महानिर्मिती, महापारेषण, महावितरणमधील कंत्राटी कामगारांच्या वेतनात १९ टक्के वाढ-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- राज्याच्या विविध भागातील महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनामध्ये १९ टक्के वाढ करण्यात येत असल्याची घोषणा ऊर्जामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत केली. ही वाढ मार्च २०२४ पासून लागू करण्यात आली आहे.

राज्यातील ऊर्जासंबंधी कार्यरत या तीनही कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत वने, सांस्कृतिक कार्य, मत्सव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे (ई-उपस्थिती), आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार किशोर जोरगेवार, माजी आमदार आशिष देशमुख, उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन, ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी, तसेच विविध कंत्राटी कामगार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनात वाढ केल्यामुळे आता राज्यातील ऊर्जा विभागात काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांचे वेतन हे अन्य राज्यातील कंत्राटी कामगारांपेक्षा सर्वांत जास्त आहे. महानिर्मिती कंपनीतील कामगारांनी ई.एस.आय.सी. ची वेतन मर्यादा ओलांडली असल्याने आता ऊर्जा विभागाच्या सर्व कंपन्यातील कंत्राटी कामगारांना ५ लाखापर्यंत आरोग्य विमा सुविधा लागू करण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री.फडणवीस यांनी जाहीर केले. कंत्राटी कामगार संघटनेने उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांचे अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले की, लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा सर्वांचा अधिकार आहे. तथापि, खापरखेडा पॉवर स्टेशनमध्ये झालेल्या आंदोलनात मारामारी, पॉवर स्टेशन बंद पाडणे आदी बाबी शासनास मान्य नाहीत. यामुळे ज्या कंत्राटी कामगारांवर आंदोलनासंदर्भात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशा कंत्राटी कामगारांबाबत विचारपूर्वक चर्चा करून निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# ई-रिक्षामुळे महिलांचे उद्योग व आर्थिक बळकटीकरणाला चालना मिळेल-पालकमंत्री संजय राठोड

यवतमाळ दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- माविमच्या महिला गटांना आपण तेजस्विनी कृषि माल वाहतूक ई-रिक्षाचे वाटप करतो आहे. या रिक्षामुळे महिलांच्या विविध उद्योग व्यवसायाला चालना मिळेल आणि त्यांच्या आर्थिक बळकटीकरणाला मदत होईल, असे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले. प्रधानमंत्री खनिकर्म योजनेंतर्गत लोक संचालित साधन केंद्र नेरच्यावतीने नेर तालुक्यातील ३६ महिला बचत गटांना तेजस्विनी कृषि माल वाहतूक ई-रिक्षाचे वाटप पालकमंत्री संजय राठोड यांच्याहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. स्वागत मंगल कार्यालय, नेर येथे आयोजित या कार्यक्रमास नेहरू महाविद्यालयाचे संस्थापक परमानंद अग्रवाल, नेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज नाल्हे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक स्नेहल भाकरे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ.रंजन वानखडे, माजी नगर परिषद सभापती भाऊराव ढवळे, सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव खोब्रागडे आदी उपस्थित होते.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने लोक संचालित साधन केंद्र नेरच्यावतीने प्रधानमंत्री खनिकर्म योजना अंतर्गत सदर ई-रिक्षाचे वितरण करण्यात आले. नेर तालक्यातील माविमच्या ३६ महिला बचत गटास सदर ई-रिक्षाचे वाटप करण्यात आले. यावेळी लोक संचालित साधन केंद्र, नेरच्या महिला बचत गटाला बँक कर्जाचे चेक वितरण आणि उत्कृष्ट काम करणाऱ्या तालुक्याच्या स्टाफला प्रमाणपत्र देऊन पालकमंत्री श्री.राठोड यांच्याहस्ते गौरविण्यात आले. जिल्ह्यात माविमच्या महिला बचत गटाला ५०० ई-रिक्षा वितरीत करण्यात येईल तसेच नेर तालुक्यातील वटफळी गावाजवळ महिला बचत गटातील एक हजार महिलांकरिता गारमेंट क्लस्टर उभारणी करण्यात येणार असल्याचे यावेळी पालकमंत्र्यांनी सांगितले. ई-रिक्षाद्वारे महिलांच्या विविध उद्योग व्यवसायाला चालना मिळेल आणि महिलांना आर्थिक बळकटीकरणला मदत होईल, असे पालकमंत्री म्हणाले.

पान १ वरून

## इलेक्ट्रॉनिक्स उद्योगासाठी ५००...

सेमीकंडक्टर उद्योगासाठी ८५ हजार तंत्रज्ञ, अभियंते आणि संशोधन व विकास तज्ज्ञ यांचे मनुष्यबळ तयार करीत आहे. आपले विद्यार्थी हे उद्योगांमध्ये काम करण्यासाठी तयार असावेत, यावर भर दिला जात आहे, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

## भारताविरोधी भूमिका मांडणाऱ्या....

परंतु यावेळी त्यांनी जे केले ते चिंताजनक आहे. अमेरिकेला भेटणारे ते पहिले विरोधी पक्षनेते ठरले. खासदार इल्हान या भारतविरोधी भूमिका घेण्यासाठी कुप्रसिद्ध आहेत.'' सुधांशू त्रिवेदी म्हणाले, ''राहुल गांधी बालिशपणाने वागत नाहीत, तर धोकादायकपणे वागत आहेत. ते आता जे करत आहेत ते भारतविरोधी घटकांना आवडेल.

भाजपाचे प्रवक्ते शेहजाद पूनावाला यांनीही यावरून टीका केली. ते वर एका पोस्टमध्ये म्हणाले, ''राहुल गांधींना तिला का भेटावे लागले? ते प्रत्येक परदेश दौऱ्यावर अत्यंत कट्टर भारतविरोधी घटकांना का भेटतात? भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनीही राहुल गांधींच्या ओमर यांच्या भेटीचा निषेध केला. त्यांनी वर एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''पाकिस्तानी नेतेदेखील अशा उद्धट घटकांबाबत अधिक सावध राहतील. काँग्रेस आता उघडपणे भारताविरोधात काम करत आहे.''

या टीकेवर प्रत्युत्तर देताना काँग्रेसने म्हटलं की, उमर हे राहुल गांधींना भेटलेल्या अमेरिकन शिष्टमंडळाचा भाग होत्या. ''भाजपाच्या नेत्यांनी आज पहिल्यांदा इल्हान उमरचे नाव ऐकले. ती एक काँग्रेस महिला आहे आणि शिष्टमंडळाचा एक भाग म्हणून आली होती,'' काँग्रेस नेते पवन खेरा यांनी इंडिया टुडे टीव्हीला सांगितले.

## शिंदेंच्या आमदाराच्या सुरक्षा...

आपआपसात झालेले मतभेद आहेत. त्याच्याशी माझा संबंध नाही. मारहाण करणारा व्यक्ती माझा बॉडीगार्ड नाही. ते असंच सांगत असतात. ज्याला मारहाण झाली आणि ज्याने मारहाण केली ते दोघेही आमच्याच पक्षाचे आहेत. आपआपसांत त्यांचे मतभेद झालेत. नेमकं काय झालंय याबाबत मला कल्पना नाही. मी दर्शन घेण्यासाठी आलो होतो, आता गेल्यानंतर त्याबाबतची माहिती घेईल. आम्हाला सत्तेची मस्ती वगैरे नाही. आम्ही आमचं काम करत आहोत. ठाकरे गट त्याच भांडवल करत आहात. संबंधित व्यक्तीवर योग्य ती कारवाई केली जाईल.

सत्तेची माज आणि माज आहे. त्याशिवाय कोण असं करत नाही. पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार झालेला आहे, असं ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते अंबादास दानवे म्हणाले आहेत.

## सेबी अध्यक्षांवर नव्याने आरोप;...

डॉ. रेड्डीज, पिडिलाइट आणि महिंद्र ॲण्ड महिंद्र या तिन्ही कंपन्यांनी काँग्रेस पक्षाने केलेले आरोप नाकारले आहेत. ॲगोरा ॲडव्हायजरीकडून व्यावसायिक अंगाने सेवा मिळविल्या गेल्याचे आणि त्यात कसलेही हितसंबंध दडले नसल्याचे शेअर बाजारांना दिलेल्या खुलासेवजा निवेदनांत या कंपन्यांनी म्हटले आहे. 'बुच यांच्या भारतीय सल्लागार संस्थेबाबत नव्याने आरोप सुरू आहेत, तर त्यांच्या मालकीच्या सिंगापूरस्थित सल्लागार कंपनीबद्दल अद्याप कोणतेही तपशील दिले गेलेले नाहीत. बुच यांनी सर्व मुद्द्यांवर अनेक आठवडे पूर्ण मौन बाळगले आहे,' असे 'एक्स'वरील टिप्पणीत हिंडेनबर्गने नमूद केले आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्यांनी भांडवली बाजाराच्या विश्वासार्हतेलाच तडा देणाऱ्या आरोपांबाबत गुंतवणूकदार चिंतित असल्याचे म्हटले असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाण्याची मागणी केली आहे.

## हिंदुत्त्व शिकवणाऱ्यांना गोमांस कसे...

खासदार राऊतांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तर तुमच्याच पक्षाच्या एका नेत्याच्या मुलाने अनेक गाड्यांना चिरडून निष्पाप लोकांना मारण्याचा प्रयत्न केला, त्याला तुम्ही अभय देत आहात. त्यामुळे हे पाप तुम्ही कुठे फेडाल? असा सवालही केला आहे.

दुसरीकडे, नागपूर पोलिसांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाने बीफ कटलेट खाल्ल्याचा आरोप फेटाळून लावला आहे. नागपूरचे पोलिस उपायुक्त (झोन-२) राहुल मदने म्हणाले, आम्हाला हॉटेलचे बिल मिळाले आहे. त्यातून ही गोष्ट स्पष्ट होते की, त्यांना गोमांस दिले गेले नव्हते.

संजय राऊत म्हणाले की, रस्त्यावर एखादा अपघात सामान्य माणसाने केला असता तर काय झालं असतं? एवढ्यात पोलिसांनी त्याच्या कुटुंबाला, मित्राला रस्त्यावर बघून धिंड काढली असती. परंतु, सलमान खान सुटतो. एखादा बिल्डरचा मुलगा सुटतो. कोणाचाही मुलगा असू दे, कायदा सर्वांसाठी सामान असायला हवा. कारची नोंदणी फक्त बावनकुळे यांच्या नावावर आहे. जोपर्यंत फडणवीस गृहमंत्री आहेत आणि त्यांच्यासोबत रश्मी शुक्ला पोलिस महासंचालक आहेत, तोपर्यंत राज्यातील कोणत्याही प्रकरणाचा तपास निष्पक्षपणे होऊ शकत नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबईत येतात. राजकीय बैठका घेतात. निवडणुकीची तयारी करतात. आमच्यावर टीका करतात. पण मणिपूरवर कधी बोलणार?. तिथे कधी ॲक्शन घेणार, मणिपूर हातातून घालवायच आहे का? सध्याची मणिपूरची स्थिती काश्मीरपेक्षा भयानक आहे. मोदी-अमित शाह त्यावर एक शब्द बोलायला तयार नाहीत. याचा अर्थ देशातील जनतेने काय घ्यायचा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युक्रेनला जाण्यापेक्षा मणिपूरला जावे. मणिपूर देशाच्या काळाजाचा तुकडा आहे. मोदींनी मणिपूरला जावं, अन्यथा राजीनामा द्यावा. आता दोष द्यायला पंडित नेहरु नाहीत, तुम्ही ११ वर्षापासून सत्तेवर आहात.

## नागपूर हिट अँन्ड रन: काँग्रेस....

(बीफ) ऑर्डर दिले होते. ही सर्व माहिती दडवण्यात येत आहे. या प्रकरणात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे बावनकुळे यांच्या पुत्राला वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप सुषमा अंधारे यांनी केला.

दरम्यान, ही घटना माझ्या मतदारसंघात घडली आहे. त्यावर आम्ही लक्ष ठेवून आहोत. या प्रकरणाची आम्हाला बाहेरून आलेल्या सुषमा अंधारे यांच्यापेक्षा अधिक माहिती आहे, असे वक्तव्य काँग्रेस आमदार विकास ठाकरे यांनी केले होते. या वक्तव्याबाबत विचारणा केली असता सुषमा अंधारे यांनी ठाकरे यांचे वक्तव्य स्थानिक राजकारणाचा भाग असू शकतो, असे उत्तर दिले. तसेच त्यांना जर माहिती होती तर या प्रकरणावर बोलण्यास ३६ तास का लागले, असा सवालही त्यांनी केला.

यासंदर्भात नंतर ठाकरे यांनी आम्ही चोवीस तास लोकांमध्ये राहून राजकारण करतो. केवळ प्रसिद्धी माध्यमातून राजकारण करीत नाही, असा टोला अंधारे यांना लगावला. तसेच या प्रकरणात माझी कोणतीही वेगळी भूमिका नाही. दोषींना शिक्षा झाली पाहिजे, असेही ठाकरे म्हणाले.

## ...तर हे भाजपावाले आज तुरुंगात...

ताकदीनिशी आम्ही जम्मू काश्मीरच्या विधानसभेत परतू.

मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्सची युती पाहून भारतीय जनता पार्टी घाबरली आहे. त्यामुळेच ते जम्मू-काश्मीरमधील उमेदवारांची यादी वारंवार बदलत आहेत. कोणत्या जागेवर कुठला उमेदवार उभा करावा हे त्यांना सुचेनासं झालं आहे. त्यांचा पक्ष या राज्यात कमकुवत आहे. भाजपाच्या गोटातील बातम्या वाचून तुम्हाला अंदाज आलाच असेल की इंडिया आघाडीची एकजूट पाहून हे भाजपावाले किती घाबरले आहेत. राहुल गांधी व फारुख अब्दुल्ला एकत्र आल्याने भाजपाच्या गोटात शांतता पसरली आहे. भाजपाने जम्मू-काश्मीरमध्ये ५ लाख नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन दिलं होतं. खर्गे यांनी याला भाजपाची जुमलेबाजी म्हटलं आहे. ते म्हणाले, भाजपाने दर वर्षी देशात २ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन दिलं होतं. ते आश्वासन भाजपावाले पूर्ण करू शकले का? उलट देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. १० वर्षे उलटली तरी हे लोक एक लाख तरुणांची भरती करू शकले नाहीत ते लोक आता पाच लाख नोकऱ्या देण्याचं आश्वासन देतायत, हे पाहून त्यांची कीव कराविशी वाटते.

# ज्येष्ठा गौरींचे झाले मनोभावे पूजन

## आज भावपूर्ण निरोप अन् विसर्जन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- बुधवारी, ११ रोजी मांगल्यपूर्ण वातावरणात ज्येष्ठा-कनिष्ठा म्हणजे गौराईचे माहेरी थाटामाटात यथासांगपणे मनोभावे पूजा करून महानैवेद्य दाखविण्यात आला. गुरुवारी, १२ रोजी भक्तिभावाने गौराईना निरोप देवून विसर्जन करण्यात येईल.

भाद्रपद शुक्लषष्ठी मंगळवार, १० सप्टेंबर रोजी रात्री ०८.४ वा. पर्यंत अनुराधा नक्षत्रावर ज्येष्ठा गौरींचे आगमन होत झाले. गणपतीपाठोपाठ ज्येष्ठा-कनिष्ठा माहेरी येतात. जेष्ठा-गौरी पूजन नेहमी जेष्ठा या बुधाच्या नक्षत्रावरच केले जाते. रात्री अष्टमी तिथी रात्री ११ वाजून ४७ मिनिटांपर्यंत आपल्याकडील जेष्ठा-गौरींची प्राणप्रतिष्ठा तसेच महानैवेद्य दाखवून पूजनविधी रात्री ९ वाजून २२ मिनिटांपर्यंत करण्यात आला. गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी २.५५ वाजेपर्यंत मूळ नक्षत्रावर विसर्जन म्हणजेच ज्येष्ठागौरींना विधिवत निरोप देण्यात येईल, अशी माहिती वेद शास्त्र संपन्न रामकृष्ण बारहाते गुरूजी यांनी दिली.

शनिवारी, ७ सप्टेंबरला श्रीं ची घरोघर हर्षोल्हासात प्रतिष्ठापना करण्यात आली. मंगळवारी, १० रोजी घरोघरी ज्येष्ठागौरींचे सोनपावलांनी आगमन झाले. गेल्या पंधरा दिवसांपासून घरोघरी गौरी-गणपती सणाची जय्यत तयारी सुरू होती. काही ठिकाणी गौरीपूजनाला महालक्ष्मी पूजन असेही म्हणतात. गौरीच्या रूपात पार्वती आपल्या बाळाला म्हणजे श्रीगणेशाला घेवून जाण्यासाठी येते, असेही मानले जाते. गौरी माहेरवाशीण असते. त्यामुळे अवघ्या दोन दिवसांचा पाहुणचार घेवून ती पुन्हा आपल्या घरी निघून जाते, अशी आख्यायिका असल्याचे वेद शास्त्र संपन्न उद्धव वजूरकर गुरूजी म्हणाले.

प्रत्येक प्रांतात गौरीपूजनाची पद्धत, कुळाचार वेगवेगळा असतो. त्यामुळे आपापल्या पद्धतीने गौरीपूजन साजरे केले जाते. गौरीला घरात आणताना रांगोळीने आठ पावले काढतात. रांगोळी काढून आकर्षक देखावे आणि सजावट केली जाते थाटामाटात घरात आणताना प्रत्येक पावलावर गौरीला थांबवून आत आणण्यात आले. महापूजनात पाना-फुलांची आरास करण्यात आली होती.

शेवंतीची वेणी माळवण्यात आली होती. पुष्पहारांसह चाफा आणि केवड्याची पानेही वाहण्यात आली. महालक्ष्मी



पूजनाचा असा सारा थाट होता.

गौरी विसर्जन नेहमी मूळ नक्षत्रावर असते. गुरुवार, १२ सप्टेंबर या दिवशी सकाळपासून ते रात्री ९ वाजून ५३ मिनिटांपर्यंत गौरी विसर्जित कराव्या. नवमी तिथी रात्री ११ वाजून ३३ मिनिटांपर्यंत आहे. विसर्जन करावयाचे असल्यास ज्यांना दूर गावी परत जाणे आवश्यक आहे, त्यांनी सकाळी पूजेनंतर अक्षता टाकून इष्ट कामना सिध्दीरस्तू पुनरागमनायचं, असे ३ वेळेस म्हणून अक्षता टाकून हा मंत्र म्हणावा व साष्टांग नमस्कार करून किंचित गौरी हलवाव्या. या प्रमाणे आपणास गुरुवारी १२ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजून ५३ मिनिटापर्यंत गौरी विसर्जन करता येईल.

## मराठा आरक्षण उपोषणकर्त्या राजश्री उंबरे पाटील यांची मंत्री अतुल सावे यांनी घेतली भेट, पाणी पाजून मुंबईत येण्याचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- मराठा आरक्षणासाठी क्रांती चौकात उपोषणाला बसलेल्या उपोषाणकर्त्या राजश्री उंबरे पाटील यांची प्रकृती खालावत आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा १० व्या दिवशी राज्याचे गृहनिर्माण आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री श्री अतुल सावे यांनी बुधवारी त्यांची भेट घेत पाणी पाजत उपोषण सोडण्याचे विनंती केली. यावेळी त्यांनी बोलतांना सांगितले की, लवकरच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या समवेत या संदर्भात बैठक घेऊ तसेच चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. यासाठी शिष्टमंडळाने आमच्या समवेत मुंबईमध्ये बैठकीत साठी यावे असे आवाहन देखील त्यांनी या प्रसंगी केले.

मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, इडब्ल्यूएस आरक्षण लागू करावे, मराठवाड्यासाठी हैदराबाद गॅझेट लागू करावा यासह आदी २१ मागण्या साठी धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या प्रदेशाध्यक्ष राजश्री उंबरे पाटील यांनी दिनांक २ तारखेपासून क्रांती चौक येथे उपोषण सुरू केले आहे. आज त्यांच्या उपोषणाचा १० दिवस होता. यावेळी मंत्री श्री अतुल सावे यांनी भेट देत सविस्तर चर्चा केली.

## एम.सी. ई. डी. व सारथी यांच्या तर्फे कुणबी, मराठा समाजातील युवती व महिलांसाठी 'आले प्रकिया प्रशिक्षण'

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम सी ई डी) तर्फे आयोजित आणि छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था(सारथी, पुणे) तसेच महाराणी सईबाई सारथी महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत आले प्रकिया (जिंजर प्रोससिंग) तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण मोफत व खास महिलाकरिता असून आले (जिंजर) वर प्रक्रिया करून आपणास काय उद्योग व्यवसाय करता येतात. या विषयी प्रात्यक्षिक द्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे या प्रशिक्षणामधे आल्यापासून पावडर निर्मिती, आल्या पासून चिप्स बनविने, आल्यापासून पाकवडी बनविणे, आल्याचे तेल बनविणे, आल्यापासून मुरंबा, आल्यापासून कँडी, आल्याचे लोणचे, तयार करणे आल्यापासून सुंठ निर्मिती या विषयावर तज्ञ व्याख्यात्याकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रशिक्षणामधून महिलांनी सक्षम होऊन स्वतःचे उद्योग उभारावे हा उद्देश आहे. या प्रशिक्षणामधे तांत्रिक प्रशिक्षणाबरोबर उद्योगसंधी मार्गदर्शन, प्रकल्प अहवाल तयार करणे, शासकीय योजनांची माहिती, उद्यम रजिस्ट्रेशन करून घेणे. तसेच बाजार पेठ व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी किमान आठवी पास असावा, पॅन कार्ड, आधार कार्ड, टीसी, महार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. वय १८ ते ४५ वर्षे दरम्यान असावे, तीन वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या मागास असल्याबाबत प्रमाणपत्र झेरॉक्स प्रतीत आवश्यक आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी प्रतिभा निमकर (९०२८०५६८००) जिल्हा प्रकल्प समन्वयक छत्रपती संभाजी नगर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय अधिकारी सुदाम थोटे यांनी केले आहे.

# गणेश उत्सव मिरवणूक मार्गाची मनपा आयुक्तांनी केली पाहणी

## पाईपवर लोबणारे वायर्स तात्काळ काढून घ्या-आयुक्त जी श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- गणेशोत्सव दहा दिवस केवळ शहरातच नव्हे, तर अख्ख्या देशभरातील वातावरण भारावलेले असते. देखावे, मेळे, विविध संगीत कार्यक्रम असा आबालवृद्धांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ निर्माण करून देणारा हा उत्सव होय. दहा दिवस मोठ्या आनंदात साजरे केले जातात. विघ्ने दूर सारण्यासाठी भक्तिभावाने लोक या उत्सवात 'श्रीं'ची भक्ती करतात;परंतु गांधी पुतळा ते गुलमंडी औरंगपुरा भागात पाईपवर लोभणारे वायर्स च्या अवकृपेने मिरवणुकीवर केव्हाही संकट येऊ शकते अशी परिस्थिती आहे. त्यामुळे ते १५ सप्टेंबरच्या आत काढून घ्या अन्यथा महापालिका यावर कारवाई करेल असा इशारा महापालिका आयुक्त प्रशासक जी श्रीकांत यांनी दिला आहे.

गणेशोत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने महापालिकेला प्रशासनाच्या वतीने शहरातील मिरवणूक मार्गची पाहणी काल संध्याकाळी ७ वाजता करण्यात आली. यावेळी पोलीस प्रशासनातर्फे सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन बगाटे तसेच शहरातील गणेश मंडळाच्या प्रतिनिधींची उपस्थित होते.

दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भाविकांना विसर्जन मिरवणूकीत कुठलीच अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाकडून काळजी घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने महापालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांनी मिरवणूक मार्गाची पाहणी करत लोंबत असलेल्या तारा वायर्स अतिक्रमण ज्याचे आहेत. त्यांनी काढून घ्यावे अन्यथा महापालिका ते काढून टाकेल असा इशारा आयुक्तांनी संबंधित भागातील नागरिकांना तथा व्यापाऱ्यांना दिला. याशिवाय मिरवणूक



मार्गावरील खड्डे बुजविणे आणि झाडांच्या फांद्या छाटून घेण्याचे आदेश यावेळी त्यांनी दिले. या आदेशाची अमलबजावणी करून आज शाहगंज ते औरंगपुरा मार्गावर झाडांच्या लांबलेल्या फांद्या छाटण्याचे काम उद्यान विभागामार्फत करण्यात आले.

## शिल्लक आलेले दहा हजार ग्राहकास परत, रोखपाल प्रशांत रत्नपारखी यांचा प्रामाणिकपणा

खामगाव दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शिल्लक आलेली दहा हजाराची रक्कम रोखपाल प्रशांत रत्नपारखी यांनी ग्राहकास परत करून प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले.

बुलडाणा अर्बनच्या अटाळी शाखेत ४ सप्टेंबर रोजी अटाळी येथील दंतरोग तज्ञ डॉ. अक्षय पाटील यांनी त्यांच्या बचत खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खात्याची रकमेचा तपशील लिहिलेली स्लीप आणि रक्कम रोखपाल रत्नपारखी यांच्या कडे दिली. त्यानंतर ते त्यांच्या दवाखान्यात गर्दी असल्यामुळे निघून गेले. काही वेळानंतर रोखपाल यांनी रोकड मोजली असता स्लीपवर लिहिलेल्या रकमेपेक्षा रोख दहा हजारांनी जास्त



असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी ही बाब शाखा व्यवस्थापक वर्षा पळसोदकर यांच्या निदर्शनास आणून दिली. शाखा व्यवस्थापक यांनी शाखेत झालेले व्यवहार आणि रोख रक्कम यांची तपासणी केली असता रक्कम जास्त असल्याचे विभागीय व्यवस्थापक प्रकाश सावळे यांना सांगितले. त्यांनीही परत शहनिशा केली. नंतर डॉ. पाटील यांना शाखेत बोलवून त्यांच्याकडून योग्य ती माहिती जाणून घेतली. त्यानंतर त्यांना दहा हजार रुपये जास्त आल्याचे सांगून रक्कम परत केली.अक्षय पाटील यांनी रक्कम परत दिल्या बद्दल बुलडाणा अर्बन परिवाराचे कौतुक केले.

## संविधान जागर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अँड. शाम तांगडे यांची निवड

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)-२९ सप्टेंबर २०२४ रोजी संविधान जागर साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या उत्साहात हे संमेलन संपन्न होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ विचारवंत अँड. शाम तांगडे यांची निवड करण्यात आली आहे. आंबेडकरी चळवळीतील एक प्रतिष्ठित कार्यकर्ता म्हणून ओळखले जाणारे अँड.शाम तांगडे हे १९७० पासून आंबेडकरी चळवळीत सक्रीय आहेत. त्यांनी दोन शासकीय नोकर्या केल्या,परंतु समाजविकासाचा ध्यास त्यांना शांत बसू देईना म्हणून त्यांनी नोकरीं सोडली आणि आपले संपूर्ण आयुष्य आंबेडकरी चळवळीला समर्पित केले आहे. या साहित्य संमेलनाच्या उद्धाटनासाठी प्रा.अंजलीताई आंबेडकर उपस्थित राहणार आहेत, तर समारोपाच्या कार्यक्रमात अँड. बाळासाहेब आंबेडकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असतील. संमेलनाचे मुख्य स्वागत अध्यक्ष, प्रसिद्ध समाजसेवक, धम्मसेवक डॉ. प्रमोद दुथडे हे असणार आहेत. या महत्त्वपूर्ण संमेलन संत एकनाथ नाट्य मंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे.

संविधान जागर साहित्य संमेलनाचे आयोजन फुले-आंबेडकर विद्वत सभा संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे. या संमेलनात विविध सामाजिक, सांस्कृतिक, आणि साहित्यिक विषयांवर चर्चा होणार असून, संविधान आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. समाजातील विविध विचारवंत, लेखक, आणि सामाजिक कार्यकर्ते या संमेलनात सहभाग घेणार आहेत. हे संमेलन समाजात संविधानाच्या महत्त्वाची जाणीव वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

अँड. शाम तांगडे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन यशस्वी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी विशेष सहकार्य करण्याचे आवाहन फुले-आंबेडकर विद्वत सभेचे पदधिकारी प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे, प्रा. भारत सिरसाट, डॉ. संजय मुन, रतनकुमार साळवे,संयोजन समितीचे के. ई. हरदास,धनराज गोंडाने, डॉ. यशवंत खडसे, सविता अभ्यंकर, अशोक जोहरे, प्रा. संजय साळवे, प्रा. मोहन सौन्दर्य, डॉ सुधाकर दिवेकर, डॉ. मिलिंदराज बुक्तरे, दादाराव त्रिभुवन, सुनील पुंडकर, शैलेंद्र मिसाळ, एस. के. बावस्कर, अँड. संघपाल भारसाखळे, दैवशीला गवांदे, शारदा पगारे, प्रा.संगीता अंभोरे, समाधान सुरडकर, गंगा सुरडकर, अँड शारदा गायकवाड, डॉ. संजय खरात,भीमराव गाडेकर,भीमराव मुगदल, गौतम वाघ,पोपटराव बागुल, साहेबराव सिरसाट, अमरदीप वानखडे, अँड. विजय वानखेडे, राजू शेगावकर, आदीसह समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## मनपा अधिकारी कर्मचारी गणेश मंडळाचा गणपती बाप्पा थाटात विराजमान



छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अधिकारी कर्मचारी गणेश मंडळाचा गणपती बाप्पा मोठ्या थाटात वाजत गाजत विराजमान झाले. मंडळाच्या वतीने महानगरपालिकेच्या टप्पा क्रं ०३ येथील प्रांगणात मा.अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील ,शहर अभियंता ए. बी.देशमुख, कार्यकारी अभियंता, बी.डी.फड, यांचे हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

यावेळी उप आयुक्त सविता सोनवणे,सहायक आयुक्त अभय प्रामाणिक,संजय सुरडकर , शंकर मरापे, सुहास जोशी,जयवंत कुलकर्णी,प्रविण कुलकर्णी,लेखाधिकारी संजय कोलते पाटील,सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू आणि मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.सतीश जोशी गुरुजी यांनी पौरोहित्य केले. मंडळाच्या वतीने गणेशोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# जुने कायगाव येथे गणेश विसर्जनाची जय्यत तयारी

गंगापूर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- तालुक्यातील जुने कायगाव येथे गणेश विसर्जनाच्या दिवशी गणेश मंडळासह भाविकांना अडचण येऊ नये, यासाठी तहसीलदार, पोलीस निरीक्षक यांनी पुढाकार घेऊन जय्यत तयारी केली आहे. विसर्जनस्थळी अग्निशामक दल, स्थानिक जीवरक्षक युवक व तगडा पोलीस बंदोबस्त नियुक्त राहणार असून स्वच्छता, विद्युत, सुरक्षा, पाणी पुरवठ्यासह लगतच्या गोदावरी नदी परिसरात तहसीलदार व पोलीस प्रशासनाने नुकतीच भेट देऊन पाहणी करत गणेशोत्सव तयारीचा आढावा घेतला. गणेश मंडळांनी, भाविकांनी नियोजित विसर्जन स्थळीच शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पारंपरिक पध्दतीने गणेशमूर्ती विसर्जित कराव्यात असे आवाहन तालुका प्रशासनाने केले आहे.

मंगळवारी दुपारी तहसीलदार नवनाथ वगवाड,पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड,गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे , नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे,नायब तहसीलदार गौरव खैरनार यांनी गणेशमूर्ती विसर्जन स्थळाची नियोजित जागा पाहणी केली. तसेच छत्रपती संभाजीनगर अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील गोदावरी पुलावरून पूर परिस्थितीची पाहणी करत नदी काठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना केल्या आहेत.

गणेशमूर्ती विसर्जन च्या दिवशी श्री रामेश्वर मंदिर लगतच्या गोदावरी घाटा जवळ होडी, थर्माकोल ची डिग्गी, बोट मशीन गणेश मूर्ती विसर्जनासाठी अहोरात्र कार्यरत ठेवावी. गणेश मंडळ आणि गणेश भक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाची आरती पूजा करून येथील टेबलावर मूर्ती ठेवायच्या स्वयं सेवक त्या घेऊन नदी पात्रात विसर्जन करतील. नदीला पाणी चालू असल्याने कोणीही नदी पाण्यात ''श्री'' विसर्जनासाठी उतरायचे नाही. विसर्जन ठिकाणी गर्दी, गोंधळ करायचे नाही, लाडक्या गणरायाला शांततेत व उत्साहपूर्ण मंगलमय वातावरणात निरोप द्याचा.असे आवाहन तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी यावेळी नागरिकांशी संवाद साधतांना केले. यावेळी सरपंच हरीचंद्र माळी,



ग्रामविकास अधिकारी के आर गादू,रामेश्वर मंदिराचे अध्यक्ष संतोष बिरुटे, उपाध्यक्ष दादासाहेब भोगे,सचिव नानासाहेब सोनवणे, बाळासाहेब चित्ते,मंडळ अधिकारी शशिकांत ठेंगे,भेंडाळा येथील तलाठी सतीश क्षीरसागर,गंगापूर चे तलाठी गणेश लोणे, बाळू चित्ते, बंडू नजन,अमोल कान्हे,रोहित बिरुटे, सचिन तुपे,जीवरक्षक दलाचे युवक व गणेश मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# जोडरस्त्यासाठी शेतकऱ्यांचा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन, दिड तास महामार्गावरील वाहतूक खोळंबली



आष्टी दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शेगाव - पंढरपूर महामार्गावरील भगवान बाबा नगर, दत्त नगर, पळशी व आनंदगाव सह शेतकऱ्यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सना - सुगीच्या काळात झालेल्या या आंदोलनामुळे दिड तास महामार्गावर वाहतूक खोळंबली होती.म रा रस्ते विकास महामंडळाकडून एका महिन्याच्या मुदतीत करुन घेण्याची जबाबदारी आष्टी ठाण्याचे सपोनी सचिन इंगेवाड यांनी दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन एका महिन्यासाठी स्थगित करण्यात आले.

आष्टी पासून माजलगाव कडे जाणाऱ्या शेगाव - पंढरपूर महामार्गाला भगवान बाबा नगर, दत्त नगर, पळशी व आनंदगाव येणाऱ्या रस्त्यालां जोडला (जांगाशन) नसल्याने या गावांच्या शेतकऱ्यांना उलट्या दिशेने जावें लागते या प्रकारामुळे अनेक अपघात झाले आहेत. पुढील मोठी दुर्घटना टाळण्यासाठी महामार्गाच्या मधोमध असलेले डिव्हायडर तोडून त्या ठिकाणी जगशेन करणे आवश्यक आहे. या बाबत प्रशासनातील जिल्हा अधिकारी व संबंधित दिंडी महामार्गाचे अधिकाऱ्यांना दिनांक ७ जुलै २०२४ रोजी कळविले होते. परंतू प्रशासन व जालना रस्ते विकास महामंडळाचे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याने वरिल गावकऱ्यांच्या वतीने दिनांक ०९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजेपासून १:०० पर्यंत दिड तास रास्ता रोको जगसेन (रास्ता जोडो) आंदोलन करण्यात आले.दरम्यान म रा रस्ते विकास महामंडळाकडून एका महिन्याच्या मुदतीत वरिल काम पुर्ण करुन देण्याचे आश्वासन आष्टी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड यांना फोनद्वारे दिले. हे काम कार्यकारी अभियंता यांच्याकडून करुन देण्याच्या जबाबदारी आष्टी ठाण्याचे सपोनी सचिन इंगेवाड यांनी शेतकरी आंदोलकांना दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन एका महिन्यासाठी स्थगित करण्यात आले. यावेळी सुग्रीव मुंडे, प्रवीण चौरे, रमेश (बंडू) नांगरे,हनुमान वाघमारे, कल्याण कारभारी, रामा डुरे बबन चौरे प्रवीण चौरे माऊली चौरे अशोक घुले मारुती चौरे सचिन तिडके सिद्धेश्वर राग माऊली चौरे पिंटू घुले उत्तम चौरे राजेभाऊ आघाव नंदू गांजेअंगद मुंडे संदीप नांगरे दत्ता तिडके दत्ता चौरे परमेश्वर चौरे कृष्णा चौरे आबा चौरे भारत तिडके कानिफ नांगरे बाळू मोरे सोपान वाघमारे सुरेश केदार लक्ष्मण चौरे दत्ता वाघ अर्जुन घुले बालासाहेब चौरे सखाराम चौरे महिपती चौरे बाबुराव चौरे विशाल मुंडे भीमा गायकवाड कृष्णा गायकवाड विशाल चौरे सचिन राख आकाश धुळे बाबासाहेब चौरे नवनाथ नांगरे सतीश नांगरे पोपट चौरे भाऊसाहेब व्यवहारे जिजा शिंदे कृष्णा मोठे यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# ....तर याच शैक्षणिक वर्षापासून मेडिकल कॉलेज सुरु होईल - आ.कैलास गोरंटयाल

जालना दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांची पदे तातडीने भरावीत यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहे. शासनाने सदर पदे भरल्यास याच शैक्षणिक वर्षापासून सदर कॉलेज सुरू होईल असा विश्वास आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजुरी पासून त्यासाठी जागा निश्चिती आणि अन्य सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी आ. कैलास गोरंटयाल यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून विधिमंडळाच्या पावसाळी, हिवाळी व अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील या प्रश्नावरून सभागृहात टोकाचा संघर्ष करत जालन्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजुरीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. राज्य सरकारने त्यांच्या या संघर्षाची दखल घेत जालन्यातील मंजूर करण्यात आलेल्या या महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासह वसतिगृह आणि अन्य बाबींसाठी तब्बल ४०४ कोटी रुपयांचा निधी देखील मागील काही महिन्यांपूर्वी मंजूर करून त्याची तरतूद केली आहे. मात्र, पद भरतीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे जालन्यासह राज्यातील ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना पदभरती करण्यासाठी केंद्रीय आरोग्य पथकाकडून दोन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. दि. २४ जून २०२४ रोजी दिल्ली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक जालना येथे आले होते. या पथकाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आलेली जागा व अन्य बाबींची तपासणी करून त्यात काही त्रुटी काढल्या होत्या. मात्र सदर त्रुटींची पूर्तता करून त्याबाबतचा अहवाल मेडिकल कौन्सिलकडे पाठविण्यात आला असल्याचे सांगून आ.गोरंटयाल म्हणाले की, दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी व्हीसीद्वारे झालेल्या सुनावणीच्या वेळी जुलै ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांच्या अधिकारात स्थानिक पातळीवर ११ सहाय्यक प्राध्यापक आणि १४ वरिष्ठ निवासी पदे भरण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, उर्वरित पदांची भरती न झाल्यामुळे प्रथम अपील अमान्य करण्यात आले होते. याप्रकरणी दुसरे अपील केंद्र ीय आरोग्य व कुटुंब कल्याण या मंत्रालयाकडे दाखल करण्यात आले असून त्यावर उद्या दि. १० सप्टेंबर मंगळवार रोजी केंद्रीयमंत्री जे.पी. नड्डा यांच्या दालनात सुनावणी होणार असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अपेक्षित असणारी जागा अधिष्ठाता यांच्या नावावर झाली असून जालना येथील सिव्हील हॉस्पिटलला मेडिकल कॉलेज संलग्न करण्यात आले आहे. शिवाय ग्लोबल गुरुकुलची जागा मेडिकल कॉलेजसाठी भाडे तत्वावर घेण्यात आली आहे. त्यामुळे आता केवळ प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक पद भरतीचा प्रश्न उरला असून राज्य शासनाच्या सचिवांनी पद भरती संदर्भातील हमीपत्र देखील केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयास सादर केले असून उद्या मंगळवारी त्यावर सुनावणी होणार असल्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक या पदांची भरती तातडीने करण्यात यावी यासाठी आपण राज्य सरकारकडे पाठपुरावा करत असून त्यासाठी सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ही पदभरती झाल्यास याच शैक्षणिक वर्षापासून जालन्यातील मेडिकल कॉलेज सुरू होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# शंभर कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी - आ. कैलास गोरंटयाल

## वीज बिलावरील खर्चात होणार कोट्यावधींची बचत

जालना दि.९ (प्रतिनीधी)- जालना विधानसभा मतदार संघातील घानेवाडी येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा जलाशय परिसरात तब्बल १०० कोटी रुपये खर्चाच्या सौरऊर्जा प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी मिळाली असल्याची माहिती आ. कैलास गोरंटयाल यांनी दिली.

जालना शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी राज्यात काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीची सत्ता असतांना आपण आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात जायकवाडी - जालना ही महत्त्वाकांक्षी योजना मंजूर करून ती कार्यान्वित देखील केली आहे. मात्र,या योजनेद्वारे जालना शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी वीज बिलांवर वर्षाकाठी जवळपास कोटयावधी रुपयांचा खर्च महानगर पालिकेला करावा लागत असून या होणाऱ्या खर्चात बचत व्हावी यासाठी आपण घानेवाडी येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा जलाशय परिसरात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्या बाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला होता. सदर प्रस्तावास मंजुरी मिळावी यासाठी आपण शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी दिली असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. २ मेगावॅट वीजनिर्मिती या प्रकल्पाद्वारे होणार असून सद्यस्थितीत १६ एमएलडी पाणी घेतल्यास महिन्याकाठी १ कोटी २५ लक्ष तर ४० ते ६० एमएलडी पाणी घेतल्यास ३ कोटी ५० लक्ष इतका खर्च होणार असून अगोदरच आर्थिक अडचणीत असलेल्या जालना महानगर पालिकेला हा खर्च झेपणारा नाही. राज्य शासनाने मंजूर केलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे दोन मेगावॅट वीज निर्मिती होणार असून यामुळे जायकवाडी - जालना या पाणीपुरवठा योजनेद्वारे करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा वीज बिलावर होणारा खर्च कमी होऊन महापालिकेला मोठी मदत होईल आणि बचत होणारा हा पैसा शहरातील विविध विकास कामांवर खर्च करता येईल असेही आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे निवेदन, पाचवा हप्ता तत्काळ न दिल्यास आंदोलन करण्याचा दिला इशारा

सोयगाव दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सोयगाव नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा शेवटचा पन्नास हजार रुपयांचा पाचवा हप्ता गेल्या चार पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याने मेटाकुटीस आलेल्या संतप्त लाभार्थ्यांनी तहसीलदार व नगरपंचायत यांच्या कडे दि. १० मंगळवारी लेखी निवेदनाद्वारे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा दिल्याने शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान लाभार्थ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे कुणीही लक्ष देत नसल्याने न्याय पालिकेकडून न्याय मिळवावा लागेल अशी चर्चा लाभार्थ्यांमध्ये रंगली होती.

याबाबत सविस्तर माहिती अशी, सोयगाव नगरपंचायतला प्रधानमंत्री आवास योजना अंमलात आली तेंव्हा पासून सण २०२४ पर्यंत शहरातील जेवढे घरकुल लाभार्थी आहेत त्या अनुषंगाने घरकुल लाभार्थीना देण्यात आलेल्या धनादेशची माहिती मिळावी. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांनी सण २०१८ १९ पासून घराचे पूर्ण काम केले आहे. घरकुल पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांनी बँकेचे कर्ज, बचतगटाच्या माध्यमातून कर्ज घेऊन घराचे काम पूर्ण केले आहे. चार,पाच वर्षांचा कालावधी लोटला मात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा शेवटचा पाचवा हप्ता ५००००/- अद्यापही मिळालेला नाही. अनेक वेळा नगरपंचायतला लेखी तक्रारी करून देखील मुख्याधिकारी लक्ष देत नाही. लाभार्थ्यांना घरकुलाचा पाचवा हप्ता ५००००/- पंधरा दिवसाच्या आत लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा.अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थ्यांनी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर, तहसीलदार सोयगाव व मुख्याधिकारी नगरपंचायत सोयगाव यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर ८५ घरकुल लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. लाभार्थ्यांना न्याय मिळतो की संघर्ष करावा लागतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




# गाडीपुरा श्री बाल गोपाल गणेश मंडळाचा उपक्रम, यंदाच्या वर्षी तयार केला श्री चिंतामणि गणेश हिंगोली चा देखावा

नांदेड दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- श्री बाल गोपाल गणेश मंडल, बोधन माता मंदिर, शास्त्री मार्केट गाडीपुरा नांदेड़ हा गणपती या गणपतीची स्थापना १९८५ मध्ये करण्यात आली.यंदाच्या वर्षी श्री बाल गोपाल गणेश मंडल, बोधन माता मंदिर, शास्त्री मार्केट गाडीपुरा नांदेड़ मंडळाने श्री चिंतामणि गणेश हिंगोलीचा हुबेहूब देखावा तयार केला आहे. सुंदर असं नक्षी काम लावलेलं पाहायला मिळत आहे

गणेशोत्सवाचा आज चौथा दिवस आहे.७ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर पर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात आहे संपूर्ण भारतात गणपती बाप्पा विराजमान झाले आहे महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा आगळा वेगळा जल्लोष असतो अनेक ठिकाणी आगळे- वेगळे देखावे साकारले गेले आहेत जे आपल्याला विविध संदेश देतात पाहूया असाच एक गणपती बाप्पाचा देखावा जो नांदेडकरांच्या अगदी जवळचा विषय बनला आहे ७ सप्टेंबर पासून गणेशोत्सवाला सुरवात झाली आहे प्रत्येकाच्या घरी विविध सजावट करून बाप्पा आसनस्थ झाले नांदेड येथे गणेशोत्सव खूप जल्लोषात असतो विविध मंडळाचे राजे, मानाचे गणपती आकर्षक देखावा साकारतात या वर्षी श्री बाल गोपाल गणेश मंडल, बोधन माता मंदिर,शास्त्री मार्केट गाडीपुरा नांदेड़ येथे गणेश मंडळाने श्री चिंतामणि गणेश हिगोली येथील प्रतिकृती गणराय स्थापना केली आहे सदरील मंडळाची कार्यकारणी अध्यक्ष दीपक सिंह लोध

सचिव जितेन्द्र सिंह लोध ,सदस्य लाखन सिंह लोध ,गजेन्द्र सिंह वर्मा ,महेश सिंह लोध आदि नी दर वर्षी वेग वेगळे देखावे नांदेडकरांना दाखवतात या वर्षी संपूर्ण नांदेड मध्ये गणपती बघ्यांची गर्दी होत आहे पालकही आवर्जून आपल्या मुलांना गणपती बघायला नेत आहेत तर गणपती बघायला निघाले असल्यास श्री बाल गोपाल गणेश मंडल, बोधन माता मंदिर, शास्त्री मार्केट गाडीपुरा नांदेड़ येथील श्री चिंतामणी गणेश हिंगोली येथील गणपती देखावा साकारलेला हा गणपती नक्की बघा नांदेडकरांना हा गणराय महत्वाचा संदेश देत आहे.



# आत्महत्या ही भारतातील गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या-डॉ. सुरज सेठिया

जालना दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जगभरात दरवर्षी ७ लाखांपेक्षा जास्त लोक आत्महत्या करतात. पण, त्यापेक्षा कित्येक पटीने अधिक लोक आत्महत्येचा प्रयत्न करतात. आत्महत्येमागे नैराश्य, असहाय्यता आणि जीवन व्यर्थ असल्याची भावना असते. यामागे वैद्यकीय कारणंही असतात. आत्महत्या ही सार्वजनिक आरोग्याची गंभीर चिंता आहे. प्रत्येक आत्महत्येचा सामाजिक, भावनिक आणि आर्थिक क्षेत्रासह समुदायांवर दूरगामी परिणाम होतो. आत्महत्येच्या विचारातून बाहेर येण्यासाठी सुसाइड हेल्पलाईनची मदत, समुपदेशन, सकारात्मक विचार आणि वैद्यकीय मदत हे मार्ग आहेत. आत्महत्या रोखल्या जाऊ शकतात, याविषयी जगभरात जनजागृती करणे हा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती मानसोपचार तज्ञ तथा धैर्य व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. सुरज राजेश सेठीया यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना डॉ. सुरज सेठीया म्हणाले की, जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन १० सप्टेंबर रोजी जागतिक स्तरावर साजरा केला जातो. आत्महत्या प्रतिबंधाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि आत्महत्येचा प्रयत्न, विचार करणाऱ्यांना अथवा प्रयत्नामुळे झालेल्या नुकसानीचा सामना करण्यासह या चक्रातून बाहेर काढण्यासाठी हा दिन साजरा केला जातो. ''चेंजिंग द नॅरेटिव्ह ऑन सुसाइड'' म्हणजेच आत्महत्येचे वर्णन बदलणे हे या दिनाची त्रेवार्षिक थीम आहे. आत्महत्येचा परिणाम आणि आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रबोधन आणि काय प्रयत्न करता येतील, याचा विचार या माध्यमातून केला जातो. तांत्रिक भाषेत जाणूनबुजून स्वतःचा जीव घेणे याला आत्महत्या असे म्हणतात. ही एक गुंतागुंतीची समस्या आहे जी जगभरातील अनेकांना भेडसावत आहे आणि तिच्यावर अनेक बदलांचा प्रभाव पडतो, जसे की क्लेशकारक वैयक्तिक अनुभव, सामाजिक- आर्थिक परिस्थिती आणि मानसिक आरोग्याशी संघर्ष. आत्महत्या ही सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या आहे. आत्महत्या रोखण्यासाठी, आत्महत्या या विषयाचा कलंक कमी करण्यासाठी जागरूकता वाढविण्यासाठी आत्महत्या या मुद्द्यावर स्पष्ट चर्चा व्हावी, या गुंतागुंतीच्या समस्येबद्दलची आपली समज बदलणे, कलंकित आणि बंद संस्कृतीपासून मुक्त, दयाळू आणि सहाय्यक असलेल्या संस्कृतीकडे जाणे हा उद्देश समोर ठेवून जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा केला जातो, अशी माहिती डॉ. सुरज सेठीया यांनी दिली.

अ ा त म ह त य ा रोखण्याबाबतच्या चर्चेला कॉल टू ॲक्शनद्वारे सुरुवात करावी. या विषयावरील चर्चा उपयुक्त असा समाज निर्माण करण्यास मदत करते. ही महत्त्वाची संभाषणे सुरू करून, आपण सर्वांनी आत्महत्येचा विचार करणाऱ्याला अथवा आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याला धीर देऊन जागरूकता वाढवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची थीम ही धोरणे तयार करताना मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंधास सर्वोच्च प्राधान्य देते, असे सांगून डॉ. सेठीया म्हणाले की, आत्महत्या रोखणे ही सार्वजनिक आरोग्याची प्राथमिकता आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या अंदाजानुसार दरवर्षी ७ लाखाहून अधिक लोक आत्महत्या करतात किंवा दर ४० सेकंदाला एक आत्महत्या होते. क्षेत्र, वयोगट आणि लिंगानुसार आत्महत्या दर भिन्न असतात; पुरुषांमध्ये स्त्रियांपेक्षा जास्त दर आढळतात. आत्महत्येपूर्वी अनेकदा चिंता, नैराश्य किंवा दीर्घ व दुर्धर आजार यासह मानसिक आरोग्याच्या समस्येमुळे आत्महत्या वाढल्या आहेत, अनेकांना आत्महत्येचे विचार येतात. विशेषत: तरुण लोकसंख्येच्या वाढत्या आत्महत्येच्या दराने भारत ग्रासलेला आहे. या चिंताजनक प्रवृत्तीचा सामना करण्यासाठी, देशभरातील विविध स्वयंसेवी संस्था या समस्येचे निराकरण करण्यासाठी बहुआयामी पद्धतींचा अवलंब करीत आहेत. आत्महत्या प्रतिबंधाच्या जनजागृतीसाठी शाळा, महाविद्यालये आणि ग्रामीण भागात कार्यशाळा, परिसंवाद आणि जागरूकता मोहिमेचे आयोजन करण्याची गरज असल्याचे डॉ. सुरज सेठीया म्हणाले.

# ४०० पेक्षा अधिक बंजारा तांड्यांना मिळणार स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा, अशासकीय सदस्य भगवान राठोड यांची माहिती

कंधार दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जिल्ह्यातील ४०० पेक्षा अधिक बंजारा, लमाण तांड्यांना लवकरच स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा मिळणार आहे. तसेच २०० पेक्षा अधिक बंजारा, लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन होणार आहेत, अशी माहिती संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा समृद्धी योजनेचे अशासकीय सदस्य भगवान राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या संदर्भात अशासकीय सदस्य भगवान राठोड म्हणाले, राज्यातील बंजारा, लमाण समाजाचा गेल्या ७५ वर्षांपासून म्हणावा तसा विकास झालेला नाही. त्यामुळे अनेक तांडे मुलभूत सुविधेपासून वंचित आहेत. त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना आणणे गरजेचे आहे. राज्य शासनाने श्री संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजना कार्यान्वित केलेली आहे. त्यामुळे बंजारा, लमाण समाज विकासाच्या मूळ प्रवाहात येणार आहे. बंजारा/लमाण तांड्यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देणे व तांड्यांमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करून बंजारा समाजाला राजकीय प्रवाहात आणणे गरजेचे आहे. यासाठी पुनर्वसित गावांच्या धर्तीवर महसूली गावांचा दर्जा देणे, ग्रामपंचायत स्थापन करणे, पाणी, वीज, शाळा, अंगणवाड्या, आरोग्य, पथदिवे, गटारे अंतर्गत रस्ते इत्यादी सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्यात बंजारा, लमाण समाजाचे अनेक तांडे असून, अशा तांड्यामध्ये बंजारा समाज अनेक वर्षांपासून राहत असला तरी अशा बंजारा, लमाण तांड्यांमध्ये प्राथमिक, मूलभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यासाठी तांड्याच्या विकासासाठी स्वतंत्र योजना असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन बंजारा, लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणे व सामूहिक विकासाच्या विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संत सेवालाल महाराज बंजारा, लमाणतांडा समृद्धी योजना सुरू करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. बंजारा, लमाण तांड्याच्या विकासासाठी संत सेवालाल महाराज बंजारा, लमाण तांडा स्मृती योजने अंतर्गत सर्व आवश्यक मूलभूत सुविधा या शासनाच्या प्रचलित मूलभूत सुविधा पुरविण्याच्या धोरणानुसार उपलब्ध करून देण्यात याव्यात असे यावेळी सांगितले. राज्यात बंजारा, लमाण समाजाची लोकसंख्या असलेल्या वस्ती, ताड्यांचा टोच नकाशा तयार करण्याचे काम युद्ध पातळीवर चालू आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४ (१) नुसार महसुली गावाचा दर्जा देण्यासाठी भूमापक क्रमांकाची माहिती तलाठी यांच्याकडून घेण्यात चालू असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष किशनराव डफडे, तालुका सरचिटणीस मधुकर डांगे, माजी नगरसेवक सतीश कांबळे आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटीने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेड (पूर्वी आयसीसी रियल्टी (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे), व्यवसाय आणि विश्रांती विभागांमध्ये लक्झरी ऑफरिंगवर प्राथमिक लक्ष केंद्रित करणाऱ्या हॉस्पिटॅलिटी कंपनीने बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे.

कंपनीच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरमध्ये प्रत्येकी १ च्या दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअर्सच्या ताज्या इश्यूचा समावेश आहे आणि एकूण २,००० कोटींपर्यंतचा हा आयपीओ आहे. एकूण ऑफर आकारात प्रत्येकी १ च्या दर्शनी मूल्याच्या एकूण २,००० कोटींपर्यंतच्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

### रीग्रीन-एक्सेलने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- रीग्रीन-एक्सेल ईपीसी इंडिया लिमिटेडने बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात, सेबीकडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे. ३१ मार्च २०२४ पर्यंत भारतातील आघाडीच्या कंपन्यांपैकी एक असलेली कंपनी इथेनॉल प्लांट्स (डिस्टिलरी, शुगर आणि कोजनरेशन, जैव इंधन, झीरो लिक्विड डिस्चार्ज सीस्टम्स आणि रिन्यूएबल एनर्जी) चे सर्वात तरुण उत्पादक आणि पुरवठादार बनली आहे (स्त्रोत: अहवाल). कंपनीच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरमध्ये ३,५०० दशलक्षपर्यंतचा नवीन इश्यू आणि प्रवर्तक विक्री करणाऱ्या भागधारकांद्वारे एकूण ११,४५०,३८० इक्विटी समभागांच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश आहे. ११,४५०,३८० इक्विटी शेअर्सच्या विक्रीच्या ऑफरमध्ये संजय श्रीनिवासराव देसाई यांच्या ३,९४४,०२० इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

### नॉर्दर्न आर्क कॅपिटलचा आयपीओ १६ सप्टेंबर रोजी खुला होणार

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- नॉर्दर्न आर्क कॅपिटल लिमिटेडचा आयपीओ सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ रोजी येत आहे. आयपीओमध्ये ५००० मिलियन रुपयांपर्यंतचे नव्याने जारी केलेले इक्विटी समभाग आणि समभागांची विक्री करू इच्छिणाऱ्या समभागधारकांकडून विक्रीसाठी प्रस्तुत करण्यात आलेले १०,५३२,३२० पर्यंत समभाग यांचा समावेश असणार आहे. प्राईस बँड प्रत्येक इक्विटी समभागासाठी २४९ ते २६३ रुपयांदरम्यान निश्चित करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या भागासाठी बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना दर इक्विटी समभागासाठी २४ रुपयांची सूट देण्यात येणार आहे. कमीत कमी ५७ इक्विटी समभागांसाठी आणि त्यापेक्षा जास्त हवे असल्यास ५७ च्या पटीत बोली लावावी लागेल.

### वेस्टर्न कॅरिअर्सचा आयपीओ शुक्रवारी खुला होणार

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- वेस्टर्न कॅरियर्स (इंडिया) लिमिटेडच्या इक्विटी शेअर्सच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरची बोली शुक्रवार, १३ सप्टेंबर २०२४ रोजी उघडेल. ऑफरमध्ये ४०० कोटींपर्यंतच्या इक्विटी शेअर्सचा नवीन इश्यू आणि राजेंद्र सेठिया यांच्या ५४ लाख इक्विटी शेअर्सच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश केला आहे. अँकर गुंतवणूकदारांसाठीची बोली/ऑफर गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४ रोजी असेल आणि बोली/ऑफर बुधवार, १८ सप्टेंबर २०२४ रोजी बंद होईल. ऑफरसाठी प्राइस बँड आहे १६३ ते १७२ प्रति इक्विटी शेअर. किमान ८७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ८७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावता येईल. कंपनीने ताज्या इश्यूमधून मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाचा वापर कंपनीने १६३.५ कोटींपर्यंतच्या काही थकबाकी कर्जाच्या काही भागाच्या प्रीपेमेंट किंवा शेड्यूल री-पेमेंटसाठी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. कंपनीच्या भांडवली खर्चाच्या गरजांसाठी निधी व्यावसायिक वाहनांच्या खरेदीसाठी, ४० फूट विशेष कंटेनर आणि २० फूट सामान्य शिपिंग कंटेनर आणि स्टॅकर्स १५१.७ कोटींपर्यंत, तसेच सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी निधीचा वापर करण्यात येईल.

# साधु संतासोबत विहार सेवेतील उल्लेखनीय योगदान-साध्वी उज्ज्वल प्रभाजी

## भारतीय तेरापंथ युवक परिषदेच्या ५८ व्या वार्षिक अधिवेशनात

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- संभाजीनगरचा तेरापंथ युवक परिषदे ला पुरस्कार. छ. संभाजीनगर प्रतिनिधि भारतीय तेरापंथ युवक परिषदेच्या ५८ व्या वार्षिक अधिवेशनात २०२३-२४ या वर्षाच्या मूल्यमापनात तेरापंथ युवक परिषद छत्रपती संभाजीनगरला ला पूर्ण भारतातून मध्यम श्रेणीत ६१ ते १२५ सदस्यांच्या परिषदेत अभातेयुपच्या मुल्याकनात सेवेच्या क्षेत्रात प्रथम स्थान , नेत्रदानच्या क्षेत्रात प्रथम क्रमांक, युवा वाहिनीच्या क्षेत्रात प्रथम स्थान, चौका सत्कार मध्ये विशेष सहकार्य, चोवीस तास निरंतर जपची उत्कृष्ट कार्यशाळेचे आयोजन. च्या सर्वोत्तम कार्यशाळेचे आयोजन करणे हेतू तेयुप संभाजी नगरला पुरस्काराने सन्मानित केले गेले. तेरापंथ किशोर मंडळ छत्रपती संभाजी नगर यांनाही वॉक विथ मंक क्षेत्रात सन्मानित केलेगेले.

यावेळी अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषदेच्या राष्ट्रीय संघाने तेरापंथ युवक परिषद छ.संभाजीनगर यांचे आभार व शुभेच्छा पाठविल्या. या राष्ट्रीय अधिवेशनात छत्रपती संभाजीनगर येथील अभतेयुप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा तेयूपचे मावळते अध्यक्ष श्री अंकुर लुनिया, विद्यमान अध्यक्ष श्री मयूर आच्छा, उपाध्यक्ष वीरेंद्र मारलेचा, सहमंत्री सौरव नाहाटा, निखिल मुथा आदी उपस्थित होते. साध्वी श्री उज्ज्वल प्रभाजी आदी ठाना चारच्या उपस्थितीत या सर्व साध्य केलेल्या ट्रॉफी समक्ष प्रस्तुत केल्या.

आपल्या भाषणात साध्वीश्रीजी म्हणाल्या की, हा तुमच्या तरुणाईसाठी प्रेरणास्त्रोत आहे, हे पाहून तुम्ही आगामी काळातही हे उपक्रम सुरू ठेवा आणि दरवर्षी राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवा. साधु संतासोबत विहार सेवेतील तुमचे उल्लेखनीय योगदान आम्ही जवळून पाहिले आहे, असेही ते म्हणाले. ही संपूर्ण तेरापंथ समाजासाठीच नव्हे तर संपूर्ण छत्रपती संभाजीनगरकरांसाठी



अभिमानाची गोष्ट आहे. भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र राज्य मंत्री श्री.पंकज सांखला व्यवस्था समितीचे अध्यक्ष श्री.सुभाष नहार, तेरापंथ सभा मंत्री श्री.अजित लोढा, तेरापंथ प्रोफेशनल फॉर्मचे अध्यक्ष डॉ.आनंद नहार, अनुव्रत समितीच्या मंत्री सौ.सुनीता सेठिया, महावीर इंटरनॅशनलचे वेस्ट जॉन सेक्रेटरी डॉ. यावेळी श्री राजकुमार बंठिया, ज्येष्ठ भक्त श्री मदनलाल आच्छा, बजरंग नाहटा, कमलेश सेठिया आदींनी शुभेच्छा व शुभेच्छा दिल्या.

# महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता, खो-खो, कबड्डी स्पर्धा यशस्वी

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शतक महोत्सवी छत्रपती संभाजीनगर जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या वतीने श्री गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून यानिमित्ताने विविध समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गणेश भक्तांचा सहभाग वाढवा या उद्देशाने सोमवारी (दि.९) शहरातील विविध भागात महापुरुष स्मारक स्वच्छता अभियान राबविण्यात आले. क्रांती चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून महापुरुष स्मारक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

संभाजी पेठेतील जिल्हा परिषदेच्या मैदानावर १७ वर्षाखालील शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागाने भव्य कबड्डी तसेच खो खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या या उदघाटन उत्सव समितीचे अध्यक्ष ऋषिकेश जैस्वाल, गणेश पवार, कार्याध्यक्ष संदीप शेळके, अनिकेत पवार, प्रसिद्धी प्रमुख सचिन अंभोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



मुलांच्या कब्बडी संघात बळीराम पाटील विद्यालय प्रथम, तर उपविजेता म्हणून जयहिंद विद्यालयाने पारितोषिक पटकवले, तर मुलींच्या कबड्डी स्पर्धेत भराडी येथील ज्ञानविकास माध्यमिक विद्यालय प्रथम तर डॉ. डी. पी पाटील विद्यालय उपविजेता ठरला. १७ वर्षाखालील या कबड्डी स्पर्धेचे पंच म्हणून पंच प्रमुख डॉ. माणिक राठोड, गणपत पवार, ज्ञानेश्वर सावंत, अल्केश चव्हाण, कृष्णा पवार, शुभम हातोळे, योगेश चव्हाण, क्रीडा शिक्षक करण लघाने, जावेद पठाण, विठ्ठल शेळके यांनी काम पाहिले. या कबड्डी स्पर्धेत जिल्ह्यातील १८ संघांनी आपला उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला. तर खो खो स्पर्धेत जिल्ह्यातील मुलांच्या १३ तर मुलींच्या १४ संघांनी आपला उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी पंच म्हणून महाराष्ट्र खो-खो असोसिएशन चे खजिनदार गोविंद शर्मा यांच्या मार्गदर्शनात दीपक सपकाळ, सचिव विकास सूर्यवंशी, श्रीपाद लोहकरे, राहुल नाईकनवरे, वरद कचरे, अनिकेत मालोदे, सूरज चिरमाडे, रोहित बोर्डे, यश मोरे, योगेश भोगे यांनी काम पाहिले. १७ वर्षाखालील मुलींच्या खो-खो स्पर्धेत प्रथम बाला नगर येथील स. भु. प्रशाला, द्वितीय आ.कृ. वाघमारे प्रशालेने पारितोषिक पटकवाले तर मुलांच्या खो-खो स्पर्धेत प्रथम कांचनवाडी येथील राजे संभाजी सैनिकी शाळा तर द्वितीय पारितोषिक राष्ट्रमाता इंदिरा गांधी विद्यालयाने पारितोषिक पटकावले विजेत्या स्पर्धाकांना अनुक्रमे प्रथम ७ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर द्वितीय संघास ५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. यावेळी महाराष्ट्र खो खो असोसिएशन चे गोविंद शर्मा, अभयकुमार नंदन, श्री गणेश महासंघाचे कार्याध्यक्ष राजेंद्र दाते पाटील, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे, शिवसेना पश्चिम तालुका प्रमुख राजेश कसूरे,अमोल सोमवंशी अजिंक्य सुरळे, सौरभ यादव, सौरभ साळुंके, यांची उपस्थिती होती.

## राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी कल्याणकारी योजना -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने अनेक प्रकल्पांना चालना दिली तर अनेक नवीन प्रकल्प सुरू केले. राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' सारख्या अनेक कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

हॉटेल आयटिसी येथे टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीच्यावतीने आयोजित 'शाश्वत विकास संमेलन' या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उमेश कुमावत आणि निखिला म्हात्रे यांनी मुलाखत घेतली, यावेळी ते बोलत होते. यावेळी टिव्ही ९ मराठीचे व्यवस्थापकीय संचालक वरूण दास यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी यंदाच्या वर्षी ३३ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. १ कोटी ६९ लाख बहिणीच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे. या योजनेत लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या लाभाच्या रकमेत पुढील काळात वाढ करण्यात येईल. ही योजना बंद होणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. समृद्धी महामार्ग, अटल सेतू, सागरी किनारा मार्ग, मेट्रो अशा प्रकल्पामुळे वाहतूक जलद झाली असून वेळ व इंधन वाचण्यास मदत होत आहे. लवकरच मेट्रो ३ सुरू होणार असून यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होणार असून लाखो लोकांचा प्रवास सुखकर होणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. श्री. शिंदे म्हणाले की, विकास प्रकल्पांना चालना देतानाच दुसरीकडे आम्ही अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना, मुख्यमंत्री वयोश्री, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री लेक लाडकी व लखपती दिदी अशा योजना राबविण्यात येत आहेत. राज्यातील सर्वसामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबाचा विचार करून या योजना सुरू केल्या आहेत. राज्यातील शेतकरी, महिला, तरुण व ज्येष्ठ अशा सर्व घटकांचा विचार हे शासन करत आहे. या सर्व योजनासाठी निधीची तरतूद करून ठेवण्यात आली आहे. मराठा समाजाला ओबीसीला देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. त्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्य शासन अनेक लोकोपयोगी व कल्याणकारी योजना राबवित आहे. या योजना लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे, त्यासाठी माध्यमांनीही सहकार्य करावे. तसेच बातम्या देताना माध्यमांनी दोन्ही बाजू जाणून घेऊन वस्तुनिष्ठ माहिती लोकांपुढे मांडावी.

# कपाशीवरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- सद्यस्थितीत कपाशीचे पिक पाते, फुले व बोंडे धरण्याच्या अवस्थेत असून काही ठिकाणी रसशोषक किडी प्रामुख्याने तुडतुडे, फुलकीडे तसेच गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव दिसुन येत आहे. कपाशीच्या पिकामध्ये डोमकळ्या (पूर्णपणे न उमलेल्या कळ्या) दिसून येत आहेत, अशा डोंमकळ्यामध्ये गुलाबी बोंडअळीच्या दुसऱ्या अवस्थेतील अळ्या असतात. त्यामुळे शेतकरी बांधवांनी कपाशी पिकाचे लगेच सर्वेक्षण करुन या रसशोषक किडी तसेच गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे,असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी कळविले आहे.

रस शोषण करणाऱ्या किडी : मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरीमाशी इ. बोंडअळी : गुलाबी बोंडअळी

आर्थिक नुकसान पातळी : मावा : १५ ते २० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे किंवा १० मावा, पान

तुडतुडे : २ ते ३ पिल्ले, पान

फुलकिडे : १० फुलकिडे, पान

पांढरी माशी : ८ ते १० प्रौढमाश्या, पान

गुलाबी बोंडअळी : ५ ते १० टक्के कळ्या, फुले, बोंडाचे नुकसान किंवा ८ ते १० पतंग, सापळा सलग ३ दिवस

**एकात्मिक व्यवस्थापन**

शेताच्या कडेने तसेच पडीक जमीनीतील किडींच्या पर्यायी वनस्पती नष्ट कराव्यात.

शेताची कोळपणी व खुरपणी करुन शेत तण विरहित ठेवावे.

रस शोषण करणाऱ्या किडी व बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून नत्र खताचा संतुलित वापर करावा.

पांढऱ्या माश्यांना आकर्षित करण्यासाठी शेतामध्ये १२ ते १५ पिवळे थिकट सापळे प्रती हेक्टरी लावावेत.

मित्र किटकांचे संवर्धन करावे.

रस शोषक किडीच्या नियंत्रणासाठी लिकॅनीसिलियम (व्हर्टिसिलियम) लिकॅनी १.१५% डब्ल्युपी ५० ग्रॅम या जैविक किटकनाशाकाची प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी घ्यावी.

गुलाबी बोंडअळ्यांच्या सर्वेक्षणासाठी ४ ते५ कामगंध सापळे व मोठ्या प्रमाणात नर पतंग पकडण्यासाठी २५ सापळे प्रति हेक्टरी लावावेत.

पक्ष्यांना बसण्यासाठी २५ पक्षी थांबे प्रति हेक्टरी लावावेत. त्यामुळे पक्षी त्यावर बसून शेतातील किडी टिपून खातील.

प्रादुर्भावग्रस्त व गळलेली पाते, बोंडे जमा करुन नष्ट करावी.

गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात

गुलाबी बोंडअळीसाठी ट्रायकोग्रामाटॉयडिया बॅक्ट्री या परोपजीवी गांधिलमाशीच्या अंड्याचे कार्ड (१.५ लाख अंडी / हे) पिकावर लावावेत.

५ टक्के निंबोळी अर्काची किंवा अॅझाडीरॅक्टीन १०००० पीपीएम १०मिली किंवा १५०० पीपीएम २५मिली किंवा अॅझाडीरॅक्टीन ३००० पीपीएम ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्या नंतरच लेबल क्लेम नुसार पुढील रासायनिक किटकनाशकांचा आलटून पालटून वापर करावा.

किडी तुडतुडे, फुलकिडी, पांढरी माशी, मावा

किटकनाशके (मात्रा प्रति १० लि.पाणी)

फ्लोनीकॅमीड ५०% डब्ल्युजी किंवा थायामिथोक्झाम २५% डब्ल्युजी मात्रा प्रति १०लि.पाणी २ ग्रॅम

डायफेन्थुरॉन ५० % डब्ल्युपी १२ ग्रॅम,बुप्रोफेझीन २५ % एससी २० मिली,फिप्रोनील ५ % एससी ३० मिली, टॉल्फेनपायरॅड १५ ईसी २० मिली, अॅसीफेट ५० %+ इमिडाक्लोप्रीड १.८ % २० ग्रॅम, फिप्रोनिल ५ % + बुप्रोफझिन २०% एससी २० मिली, फिप्रोनिल ४ % + अॅसिटामिप्रिड ४ % एससी २०मिली, पायरीप्रॉक्सीफेन ५ % + डायफेंथियुरॉन २५ % एसई २० मिली, क्लॉथियानिडिन ३.५ % +



पायरीप्रॉक्सीफेन ८ % २५ मिली, पायरीप्रॉक्साफेन ८ % + डिनोटेफुरान ५ % + डायफेंथियुरॉन १८ % एससी १२ मिली, डायफेंथियुरॉन ३० % + पायरीप्रॉक्सीफेन ८% एसी २० मिली, डिनोटेफुरान ४ % + अॅसीफेट ५० % एसजी १७.६ ग्रॅम.

किडी पांढरी माशी, तुडतुडे

किटकनाशके (मात्रा प्रति १० लि.पाणी)

पायरिप्रॉक्सीफेन ५ % + फेनप्रोपॅथ्रिन १५ % ईसी १२ मिली

बीटा-सायफ्लुथ्रीन ८.४९% + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ४ मिली.

बुप्रोफेझिन १५ % + अॅसीफेट ३५% डब्लुपी २५ ग्रॅम.

पिठ्या ढेकूण

किटकनाशके (मात्रा प्रति १० लि.पाणी)

क्लोरपायरिफॉस २० % ईसी २० मिली

ब्रुप्रोफेझीन २५ % ईसी २० मिली

लाल कोळी

किटकनाशके (मात्रा प्रति १० लि.पाणी)

डायकोफॉल १८.५ % ईसी ५४ मिली

स्पायरोमेसिफेन २२.९ % एससी १२ मिली

गुलाबी बोंडअळी

किटकनाशके (मात्रा प्रति १० लि.पाणी)

प्रोफेनोफॉस ५० % ईसी ३० मिली

क्विनालफॉस २० % एएफ २५ मिली

क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली

थायोडीकार्ब ७५ % डब्ल्युपी २० ग्रॅम

इमामेक्टीन बेन्झोएट ५ % एसजी ४ ग्रॅम

स्पिनोसॅड ४५ % ४ मिली

क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एससी ३ मिली

फ्ल्युबेन्डामाईड ३६.३५ % एसी २.५ मिली

थायमिथोक्झाम १२.६ % + लॅमडा साहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी ४ मिली

क्लोरॅन्ट्रनिलीप्रोल ९.३ % + लॅमडा साहॅलोथ्रिन ४.६ % झेडसी ५ मिली

पायरीप्रॉक्सीफेन ५ % + फेनप्रोपॅथ्रिन १५ % ईसी १० मिली

प्रोफेनोफोस ४० % + सायपरमेथ्रीन ४ % ईसी २० मिली

तुडतुडे फुलकिडी, पांढरी माशी, मावा, गुलाबी बोंडअळी

किटकनाशके (मात्रा प्रति १० लि.पाणी)

फिप्रोनिल १५ % + फ्लॉनिकॅमिड १५ % डब्लूडीजी ८ ग्रॅम

अॅसिटामिप्रिड २५ % बायफेन्थ्रीन २५ % डब्लूजी ३.२ ग्रॅम

अॅसीफेट ५०% + इमिडाक्लोप्रिड १.८०% एसपी २० ग्रॅम

इमामेक्टिन बेंझोएट १.५ % + प्रोफेनोफोस ३५% डब्लूडीजी १४ ग्रॅम

क्लोरपायरीफॉस ५०%+ सायपरमेथ्रीन ५ % ईसी २० मिली

वरील कटीकनाशकाचे प्रमाण साध्या पंपासाठी आहे, पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. शेतात कीटकनाशकाचे द्रावण करतानी व फवारणी करताना चष्मा, हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा. पायरेथ्रॉईड गटातील कीटकनाशकाची (लॅमडा सायहॅलोथ्रीन) फवारणी नोव्हेंबर महिन्याअगोदर सुरु करु नये. यामुळे पांढऱ्या माशीचा उद्रेक होऊ शकतो.

**विविध किड आणि रोग नियंत्रण उपाययोजना**

भात पिकावर खोड किडीचा नियंत्रणासाठी फ्रिप्रोनिल ५. सी.एस %२० मि किंवा लि. फ्लुबेंडामाईड ३९.सी.एस % ३५ २ लिटर पाण्यात मिसळून फवारणी १० मिली प्रती ५ पावसाची उघडीप पाहून करावी.

कापसावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्क पावसाची उघउीप पाहून फवारावे.

खरीप ज्वारी पिकात लष्करी अळीचा प्रादर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११ टक्के एससी ७ लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकाची आलटून पालटून १० मिली प्रति ४ पावसाची उद्याड बघून फवारणी करावी.

स्पोडोप्टेरा अळीचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी प्रती ५ फेरोमन सापळे लावावेत.

दैनिक
# ग्लोबल भारत
वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

## वर्धापण दिन निमित्त लवकरच घेऊन येत आहोत..

# गौरव पुरस्कार २०२४




सामाजिक, राजकीय, उद्योग, शिक्षण, सांस्कृतीक, सहकार, महिला, पत्रकार, आरोग्य, कृषी, युवा, कामगार, शासकीय-निमशासकीय सेवा इत्यादी क्षेत्रात नावीण्यपूर्ण काम करणाऱ्यांना गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.

## शेवटची दिनांक - १० सप्टेंबर २०२४

## नोंदणीसाठी संपर्क

**Mobile No. 9403502555**
**dailyglobalbharat@gmail.com**